किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● विश्वकुटुंब

५● कुटुंब व करिअर जपानी स्त्रियांचे

११● 'ग्लॅसिअर' सांगतात...

१७● धोके ओळखा व टाळा!

२१● विषमतेची बाजारपेठीय रूपे

२७● अभ्यास, मत बनविणा-या घटकांचा...

३३● ज़िकडेतिकडे (एक मस्त 'खुशाल' कलंदर)


**खंड १३ : अंक २** **मे २०१४**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १३ (अंक २) मे २०१४**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

### *अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

### *अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# विश्वकुटुंब

कुटुंब हा समाजजीवनाचा पाया मानला जातो. नवीन पिढीला घडविणारे कुटुंब घरातील ज्येष्ठांची व वृद्धांची काळजी घेत असते. तीन-चार पिढ्यांचे कुटुंब एकत्र नांदण्याचा काळ मागे पडून विभक्त कुटुंबपद्धती स्थिरावली असली तरी कुटुंबपद्धतीचे महत्त्व त्यामुळे कमी होत नाही. उलट, अर्थार्जनासाठी स्त्रिया घराबाहेर पडल्याने लहान मुलांची काळजी घेण्यासाठी आजीआजोबांची गरज भासू लागली. तसेच, आयुर्मान वाढल्याने ज्येष्ठांची सेवाशुश्रुषा हाही काळजीचा विषय ठरला. परंपरेला महत्त्व देणा-या समाजजीवनात काही बदल स्वीकारले गेले तर काही नाही. परंपरेला व कुटुंबाला प्राधान्य देणा-या जपानमधील कुटुंबांमध्ये काय घडते आहे, स्त्रियांना नोक-यांच्या संधी मिळत आहेत किंवा कसे हा विषय १५ मे रोजी येणा-या जागतिक कुटुंबदिनानिमित्ताने या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे. जगभरातील कुटुंबांचे भरणपोषण करणा-या पृथ्वीसाठी 'अर्थ डे' अलीकडेच साजरा करण्यात आला. वसुंधरेचे रक्षण करणे विश्वकुटुंबाच्या हिताचे ठरणार आहे, हे आता मानवसमूहांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे पृथ्वीची आणि पर्यावरणाची काळजी घेण्याचे संकल्प व कृतीही केली जात आहे. विशेषतः, पृथ्वीचे वाढते तापमान व त्यामुळे होणारे वातावरणातील बदल आणि पर्यावरणाची हानी हे मुद्दे 'इंटर गव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज' (IPCC) यांच्यातर्फे सतत मांडण्यात येत असतात. वातावरणातील बदलांचे परिणाम प्रसंगी नैसर्गिक संकटांद्वारे अनुभवास येतात. उत्तराखंडात गेल्या वर्षी १६ व १७ जून रोजी कोसळलेल्या नैसर्गिक संकटांनंतर तर हे सर्व आपल्या भूमीत घडून येत असल्याचे दिसून आले. वसुंधरेची आस्थेवाइक देखभाल, निसर्गाचे रक्षण-संवर्धन यांमुळेच विश्वकुटुंब टिकणार आहे, सातत्यपूर्ण विकास शक्य बनणार आहे हीच बाब या संदर्भातील संशोधकांचे अभ्यास अधोरेखित करत आहेत. केदारनाथ परिसरातील दुर्घटनेला येत्या जूनमध्ये एक वर्ष पूर्ण होत आहे, तसेच ५ जून रोजी जागतिक पर्यावरणदिनही आहे. पर्यावरणविषयक अभ्यासांतून पुढे येत असलेल्या बाबींचा ऊहापोह, म्हणूनच, या अंकात मांडला आहे.



विश्वकुटुंबाचे कल्याण नैसर्गिक पर्यावरणाइतकेच मानवनिर्मित सामाजिक पर्यावरणाच्या मगदुरावरही निर्भर असते. सामाजिक पर्यावरणाचा कस अखेर अवलंबून राहतो तो नेतृत्त्वाच्या गुणवत्तेवर. नेतृत्त्वाची निवड होत असताना गुणवत्ता जोखली जाते अथवा नाही, ही बाब मग कळीची ठरते. आपल्या देशात सध्या सर्वत्र निवडणुकांची धामधूम सुरू आहे. निवडणुकांच्या वेळी मत देताना कोणकोणत्या घटकांबाबत मतदार कसकसा विचार करत असावेत यांबाबतचा अभ्यास भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे अध्यक्ष डॉ. विकास चित्रे करत आहेत. या संदर्भातील त्यांच्या विवेचनाचा पहिला भाग 'अर्थबोधपत्रिके'च्या गेल्या महिन्याच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आला होता. त्याचाच आणखी काही तपशील या अंकात मांडलेला आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विचारार्ह ठरतात. अर्थात, हे सगळे कोणी तितक्याच संवेदनशीलतेने वाचले तर ! ■■

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

सामाजिक

# कुटुंब व करिअर जपानी स्त्रियांचे

अडचणींचे एकेक टप्पे नेटाने पार करत जगभरातील स्त्रियांनी प्रगतीच्या दिशेने होणारी आपली वाटचाल चालू ठेवली आहे, हे कौतुकाचे आहे. विविध क्षेत्रांत कार्य करणा-या स्त्रियांची संख्या पूर्वी बोटांवर मोजता येईल इतकी कमी होती तर, आता स्त्रियांची पावले आढळत नाहीत अशा क्षेत्रांची संख्या बोटावर मोजता येईल, अशी परिस्थिती आहे. कार्याचा हा आलेख उंचावत असतानाच स्त्रियांची काळजी वाटावी अशा घटनाही जगभरात घडत आहेत. स्त्रियांना दुय्यम लेखणे, स्त्रियांवर अन्याय-अत्याचार करणे, त्यांना समानतेची वागणूक न देणे या घटना जगभरात अजूनही घडतच आहेत.

कुटुंब हा सुदृढ समाजव्यवस्थेचा पाया मानला जातो. आजही बहुसंख्य देशांमध्ये कुटुंबाची जबाबदारी प्रामुख्याने स्त्रियांवर आहे. अर्थार्जनातील स्त्रियांचा सहभाग वाढता व उल्लेखनीय असला तरी कौटुंबिक जबाबदारीला प्राधान्य देत स्त्रिया पुढे जात असतात. ही तारेवरची कसरत करणे अशक्य होऊ न बसते तेव्हा अनेक स्त्रिया नोकरीपेक्षा कुटुंबाला महत्त्व देतात व नोकरी सोडण्याचा पर्याय स्वीकारतात. या संदर्भात प्रगत देशात गणल्या जाणा-या जपानमध्ये काही घडामोडी घडत आहेत. अलीकडच्या काळात जपानला प्रश्न भेडसावतो आहे तो श्रमशक्तीचा. OECDच्या अभ्यासानुसार जपानमध्ये श्रमशक्तीतील सहभागाचे स्त्रियांचे प्रामण ६३ टक्के इतके आहे. स्वीडन, नॉर्वे, जर्मनी, ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स या प्रगत देशांच्या तुलनेत तो कमी आहे. शिवाय, ७० टक्के स्त्रिया पहिल्या अपत्याचा जन्म झाल्यानंतर बालसंगोपनासाठी नोकरी सोडण्याचा पर्याय स्वीकारतात. अगदी उच्चशिक्षित स्त्रियाही यात मागे नाहीत. किंबहुना, उच्चशिक्षित स्त्रियांसाठी तर ‘कुटुंब की करिअर’ हा प्रश्न अधिक गंभीर ठरतो. कामाचे प्रदीर्घ तास, नोकरीत वरिष्ठांबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करण्यासाठी द्यावा लागणारा वेळ ही प्रमुख कारणे यामागे आहेत.



जपानी कंपन्यांमध्ये nominication असा एक प्रकार असतो. कार्यालयीन कामकाज झाल्यानंतर वरिष्ठांबरोबर रात्री उशीरापर्यंत चालणा-या संवाद-पार्ट्या असे याचे स्वरूप असते. जपानी भाषेत ‘ड्रिंक्स’ घेण्यासाठी nomu असा शब्द योजिला जातो. हा शब्द आणि इंग्रजी भाषेतील संवाददर्शक असणारा communication या दोन शब्दांच्या संयोगातून nominication असा शब्द तयार करण्यात आला आहे. हे nominication ही स्त्रियांसाठी अडचणीची बाब ठरते. कारण, कुटुंबाला वेळ द्यायचा की nominicationला असा प्रश्न जपानी स्त्रियांना पडतो. या शिवाय कंपन्यांच्या कामकाजासंदर्भात ‘ग्लास सीलिंग’चा सामना जपानी स्त्रियांना करावा लागतो. स्त्री-पुरुषांमधील असमानतेची ही जणू एक जाणवणारी आणि अदृष्य पण पारदर्शक अशी भिंत असते. अलीकडेच ‘द इकॉनॉमिस्ट’ या नियतकालिकाने काही देशांमधील ‘ग्लास सीलिंग इंडेक्स’ मोजला. उच्च शिक्षण, श्रमशक्तीतील स्त्रियांचा सहभाग, वेतन, मातृत्वहक्कांबाबत मिळणा-या सोयीसुविधा, बालसंगोपनाचा खर्च असे काही घटक या वेळी विचारात घेण्यात आले होते. प्रगत देशांमध्ये जपान आणि दक्षिण कोरिया हे देश पिछाडीवर असल्याचे त्यात दिसून आले.

जपानमधील स्त्रिया ‘ग्लास सीलिंग’ला ‘बांबू सीलिंग’ असेही संबोधतात. कारण त्याच्या मते ते कठीण, जाड व अपारदर्शक असे आहे. त्यात सुधारणा होण्याची गती मंदच आहे. १९८९ मध्ये तेथे कंपनीच्या विभागप्रमुखपदी असणा-या महिलांचे प्रमाण १.२ टक्के इतके होते तर, २०११मध्ये ते ४.५ टक्के इतके वाढले. कंपन्यांमध्ये कार्यकारी समितीत वा व्यवस्थापकपदी असणा-या महिलांचे प्रमाण २०११मध्ये फक्त १ टक्का इतके होते, त्याचवेळी ते प्रमाण चीनमध्ये ९ टक्के व सिंगापूरमध्ये १५ टक्के इतके होते. उच्च शिक्षणानंतर नोक-यांच्या संधी मिळाल्या तरी नोक-या बदलण्यास जपानमध्ये संधी मिळत नाही. नोकरीमध्ये टिकून राहणे याला तिथे महत्त्व दिले जाते. कारण, पदोन्नती देताना कंपनीत किती वर्षे व साधारणपणे किती तास जादा काम केले या बाबी तिथे महत्त्वाच्या ठरतात. पदोन्नतीच्या वेळी कार्यक्षमता पिछाडीवर पडते. त्या बाबतीत तिथे सरळसरळ भेदभाव केला जातो.

जपानी व अमेरिकी स्त्रिया नोक-या का सोडतात याची कारणे शोधण्यासाठी एक अभ्यास-सर्वेक्षण करण्यात आले होते. तेव्हा बालसंगोपन व ज्येष्ठांची काळजी अशी कारणे अमेरिकी स्त्रियांनी सांगितली. तर जपानी स्त्रियांनी नोकरीतील असमाधान आणि मार्ग खुंटणा-या, एका न सुटणा-या पेचात म्हणजे 'इकडे आड, तिकडे विहीर' अशा परिस्थितीत आपण अडकलो आहोत असे सांगितले होते. या जपानी स्त्रियांना घरकामात वा अपत्य संगोपनात नव-यांकडून कोणतीही मदत मिळू शकत नव्हती कारण त्या पुरु षांना त्यांच्या नोकरीच्या ठिकाणी अधिक वेळ द्यावा लागत होता. जपानी स्त्रियांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असल्या तरी वरिष्ठ पदांवर काम करण्यासाठी त्यांची नियुक्ती अपवादानेच केली जात होती. कनिष्ठ पदांवर स्त्रिया व व्यवस्थापकपदांवर पुरु ष असेच चित्र साधारणपणे तिथे आढळते. व्यापारउद्योगाच्या क्षेत्राप्रमाणे राजकारणातही जपानी स्त्रियांचे प्रतिनिधित्व कमी प्रमाणातच आहे.

अर्थात, अशी परिस्थिती असली तरी सर्वच जपानी स्त्रिया नोकरी करण्यास उत्सुक असतात असेही नाही. तीन वेळा जेवण अणि दुपारची झोप (जपानी भाषेत sanshoku hirune tsuki ) मिळत असेल तर जीवाची तडतड करून नोकरी करण्यापेक्षा शांतपणे घर सांभाळण्याकडेही स्त्रियांचा कल असतो. तर, अनेकदा स्त्रियांना नोकरी करायची असते पण उच्चपदांवर पोहचण्याची ईर्षा वा महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनात असतेच असे नाही.

जपानमधील स्त्रियांच्या करिअरबाबतच्या विचारांत चढउतार आढळतात. १९७९ च्या सुमारास ''नव-याची भूमिका 'मिळवता पुरु ष' आणि स्त्रीची भूमिका 'पूर्णवेळ गृहिणी' अशी असली तर चालेल'', या विधानाच्या बाजूने सुमारे ७० टक्के स्त्रियांनी कल दर्शविला होता. २००४मध्ये हे प्रमाण ४१ टक्के इतके कमी झालेले होते. २००७-०९ या काळात हे प्रमाण सुमारे ५० टक्के इतके होते. २०१२मध्ये केलेल्या एका सर्वेक्षणात एकूणांतील एक तृतीयांश स्त्रियांना 'पूर्णवेळ गृहिणी' ही भूमिका मान्य आहे, असे दिसून आले. त्या उलट तरु णांना मात्र पत्नीने 'नोकरदार' असावे असे वाटते आणि एकूणांतील एक पंचमांश तरु णांचे मत ' पत्नी पूर्णवेळ गृहिणी असावी' या बाजूने आहे, असे दिसून आले.



जपानबाबत एक उल्लेखनीय बाब अशी की विविध देशांमध्ये स्त्रीवादाची चर्चा होऊ न स्त्रीवादाला समाजजीवनात व धोरणांत एक स्थान मिळाले तसे जपानमध्ये घडले नाही. स्त्रीवाद तिथे पिछाडीवरच राहिला. आर्थिक प्रगतीत आघाडी मिळवलेल्या जपानमध्ये स्त्रीची परंपरागत 'कौटुंबिक' भूमिका फारशी चर्चेत आली नाही. जणू समाजाने ती कायमस्वरूपी मान्य केली असे वाटावे असे तेथील चित्र आहे. मुख्य म्हणजे तिथे गृहिणीच्या हाती घराची सत्ता आहे. घरातील अर्थव्यवहार स्त्रिया सांभाळतात. असे असले तरी आता केवळ मिळवत्या पुरु षाच्या कमाईवर घराचा गाडा ओढणे कठीण होऊ लागले आहे. कुटुंबाची आर्थिक गरज म्हणून स्त्रियांना नोकरीकडे वळावे लागते आहे. शिवाय, तेथील घटस्फोटांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे देखील कमावते असणे स्त्रियांना भाग पडते आहे. त्यामुळे, एकीकडे गृहिणीपद चालेल असे म्हणणा-या तरु णी जपानी समाजात असल्या तरी नोकरी नसल्यामुळे पालकांवर अवलंबून असणा-या तरु णींना/ स्त्रियांना आता बदल हवा आहे, असे तिथे दिसून येते.

महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झालेल्या विशी-पंचविशीच्या जपानी तरू णींचा दृष्टिकोण/मानसिकता जागतिकीकरणाला चांगल्या पद्धतीने सामोरे जाण्यासाठी बदलते आहे. जागतिकीकरण समजावून घेऊ न त्या जागतिक नागरिक बनू पाहत आहेत. जपानी तरु णांच्या तुलनेत त्या करिअरमध्ये अधिक रस घेत असून नोकरीतील जबाबदारी पेलण्यास त्या उत्सुक आहेत. त्यामुळे अलीकडच्या काळात काही कंपन्यांमध्ये तरु णींना नोक-या देण्याचे प्रमाण वाढले आहे. पण विवाहानंतर या तरुणी नोक-यांमध्ये टिकून राहतील किंवा कसे याची चिंता कंपन्यांना वाटते, असे मत कंपनीच्या अधिकारीवर्गाकडून मांडले जाते. जपानमधील तरु णांमध्ये काही बदल घडत आहेत. पूर्वीच्या पिढीतील 'मिळवता पुरु ष' आणि 'पूर्णवेळ गृहिणी' या दोन ठरावीक भूमिकांपेक्षा वेगळा विचार ते करीत आहेत आणि (पत्नीला मदत करण्यासाठी ?) बालसंगोपनात रस घेत आहेत, अशी चर्चा तेथील माध्यमांमध्ये घडून येते आहे. दरम्यान, नोक-यांमध्ये स्त्रियांना अधिक संधी मिळावी, त्यांच्या अंगभूत कौशल्यांना वाव मिळावा यासाठी तेथील सरकार आणि कंपन्या काही धोरणे आखत आहेत.

जपानचे विद्यमान पंतप्रधान Shinzo Abe हे conservative Liberal Democratic Party पक्षाचे नेते असून या पक्षाची भूमिका 'मिळवता पुरुष' आणि 'पूर्णवेळ गृहिणी' या बाजूची होती. त्यांच्या आधीच्या सरकारने २००५ मध्ये स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने पावले उचलण्याचा प्रयत्न केला होता तेव्हा, जपानची संस्कृती आणि कौटुंबिक मूल्ये यांचे नुकसान होईल, असा इशारा त्यांच्या पक्षाने दिला होता. मुलींचे खेळणे असलेल्या बाहुलीला जपानच्या संस्कृतीत महत्त्व असून बाहुल्यांचे विशिष्ट खेळ लोप पावतील, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली होती. जपानला श्रमशक्तीची गरज आहे, तेथील जन्मदर कमी आहे आणि नोकरी न करता स्त्रियांनी घरी थांबण्यास प्राधान्य दिले तर जपानची लोकसंख्या वाढण्यास मदत होईल, असाही या पक्षाचा तेव्हा कयास होता. पण हा कयास बरोबर ठरला नाही. जननदरात घसरण होऊन २००५ मध्ये तो १.२६ इतका झाला आणि त्यात अल्पशी वाढ होऊन २०१२मध्ये १.४१ इतका झाला. जननदर वाढला नाही तर आर्थिकदृष्ट्या सक्रिय गणल्या जाणा-या मनुष्यबळाच्या प्रमाणात २०५०मध्ये ४० टक्क्यांनी घट होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. असे झाल्यास अर्थव्यवस्थेला हानी पोहचेल, म्हणून स्त्रियांना नोक-यांमध्ये सामावून घेण्याचा विचार पुढे आला.

गंमत म्हणजे आता Shinzo Abe यांच्या सरकारने आपली भूमिका बदलली असून त्यांचे सरकार आता स्त्रियांना नोक-या करण्यास प्रोत्साहन देते आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत चमकण्याची संधी स्त्रियांना देणे हा Abe यांच्या Abenomics चा महत्त्वाचा भाग आहे. स्त्रियांचा सहभाग वाढल्यास अर्थव्यवस्थेतील मनुष्यबळ सुमारे ८० लाखांनी वाढेल व त्यामुळे ठोकळ राष्ट्रीय उत्पादितामध्ये (जीडीपी) १५ टक्क्यांनी वाढ घडून येईल, असा अंदाज संबंधित तज्ज्ञांकडून मांडला गेला आहे. नोकरदार महिलांची संख्या वाढली आणि त्यांच्या हाती पगार पडला की विविध वस्तूंची मागणी वाढण्याची, बाजारपेठ विस्तारण्याची या शक्यता वाढते. त्यामुळे Abe यांच्या भाषणात मुलांची काळजी घेण्यासाठी चांगल्या पाळणाघरांच्या सोयी असणे, नोकरदार स्तनदा मातांसमोर उभी ठाकणारी आव्हाने असे काही मुद्दे आता मांडले जात आहेत.



जपानमध्ये मोठ्या शहरांमधील स्त्रियांच्या नोक-यांच्या संदर्भात विविध मुद्द्यांची चर्चा होत असतानाच ग्रामीण भागात काहीसे वेगळे चित्र आढळते. ग्रामीण भागातील स्त्रिया अधिक प्रमाणात रोजगारविषयक कामात सहभागी होत असून ग्रामीण भागातील स्त्रियांमधील जननदर शहरी भागातील स्त्रियांच्या जननदराच्या तुलनेत अधिक आहे. बालसंगोपनासाठी ग्रामीण भागातील स्त्रियांना त्यांच्या पालकांची मदत मिळते म्हणून त्यांना घराबाहेर पडणे शक्य होते असे मत मांडले जाते. अनेक विकसित देशांमध्ये अपत्यजन्मानंतर स्त्रियांचे नोक-या करण्याचे प्रमाण घटते. पण मुले मोठी होतात तसतसे हळूहळू ते प्रमाण वाढते. जपानमध्ये मात्र हे प्रमाण वाढण्याचे प्रमाण कमीच आहे. अनेक स्त्रिया अर्धवेळ नोकरीचा पर्याय स्वीकारतात असेही अढळते. ३० ते ३४ या वयोगटातील अर्धवेळ नोकरी करणा-या स्त्रियांचे प्रमाण जपानमध्ये २००४साली सुमारे ६१ टक्के इतके होते तर २०१२ मध्ये ते ६९ टक्क्यांपर्यंत वाढलेले आढळते.

जपानमधील कंपन्यांच्या कार्यसंस्कृतीत बदल घडून आले तर शहरांमधील स्त्रियांना नोक-यांच्या अधिक संधी उपलब्ध होतील, असा काहींचा अंदाज आहे. काही कंपन्या बदलांना अनुकूलता दर्शवित आहेत. विशेषतः, अमेरिकी कंपन्यांबरोबर काम करणा-या कंपन्यांना असे आढळते आहे की अमेरिकी कंपन्यांमधील कर्मचारी स्त्रिया कार्यालयात उशीरापर्यंत थांबत नाहीत. आवश्यकता असल्यास व शक्य तेव्हा कार्यालयीन कामकाज त्या संगणकावर घरी पूर्ण करतात. अशा काही सोयी कर्मचा-यांना देण्याचा विचार अलीकडे तेथे होऊ लागला आहे. पाळणाघरांच्या सोयीसुविधा दिल्या तरी पाळणाघरांत मुले ठेवण्यासाठी जपानी स्त्रिया चटकन तयार होतील असे नाही. त्या शिवाय, ज्येष्ठ नागरिकांची सेवा हाही जपानमध्ये काळजीचा भाग बनला आहे. त्यामुळे बालसंगोपन व वृद्धांची सेवा-शुश्रुषा यासाठी परदेशांमधील नागरिकांना निमंत्रण देण्याच्या दृष्टीने स्थलांतराबाबतचे नियम शिथिल करण्याचीही चर्चा तेथे आहे. एकंदरीत पाहता, बालसंगोपनात व कौटुंबिक कामकाजात जपानी स्त्रियांचा खर्च होणारा वेळ कसा वाचेल आणि नोक-यांमधील त्यांचा सहभाग कसा वाढेल याची चर्चा जपानमध्ये आहे. Abe यांच्या धोरणांमधून काय बदल घडतात ते पाहायचे! ■■

पर्यावरण १

# 'ग्लॅसिअर' सांगतात...

उत्तराखंडच्या डोंगराळ प्रदेशात १६ व १७ जून २०१३ रोजी नैसर्गिक आपत्ती कोसळल्यानंतर त्या भागांतील भौगोलिक घडामोडींबाबत अनेक अभ्यास होऊ लागले आहेत. जे काही घडले ते का व कसे घडले याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यातून लक्षात आले आहे ते असे की 'ग्लॅसिअर'च्या ('ग्लॅसिअर' म्हणजे हिमनदी वा बर्फाळ पट्टा) वरच्या थरातील हालचाल इथे महत्त्वाची ठरत असून त्याबाबतच्या बदलत्या घडामोडी सतत जाणून घेत राहणे गरजेचे आहे. तथापि 'ग्लॅसिअर' विषयक अभ्यास-विचार पुरेशा गांभीर्याने झालेला दिसत नाही. या संदर्भात अलीकडे काही नवीन माहिती पुढे आली आहे.

या अभ्यासांतून असे दिसते की, सभोवतालच्या तापमानाचा थेट परिणाम 'ग्लॅसिअर'वर होत असतो. त्या परिणामानुसार ते प्रसरण पावत असतात. एकाप्रकारे, वातावरणातील बदल जणू 'ग्लॅसिअर' नोंदवून ठेवत असतात आणि भूगर्भविज्ञानाशी संबंधित घटनांचा पट जणू त्याद्वारे उलगडला जात असतो. त्यातही, बदलत्या तापमानाशी संबंधित असलेले व 'ग्लॅसिअर'वर पहिल्या टप्प्यात घडून येणारे परिणाम व बदल अभ्यासासाठी अधिक उपयुक्त ठरतात. नैसर्गिक आपत्तींमुळेही 'ग्लॅसिअर'वर सखोल परिणाम होतात. विशेषतः, हिमालयातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता हे परिणाम अधिक महत्त्वपूर्ण असे ठरतात.

गेल्या वर्षी तेथे नैसर्गिक आपत्ती कोसळली व अखंड अतिवृष्टी झाली तेव्हा केदारनाथच्या उत्तरेला असलेले गांधी सरोवर तुडुंब भरले, अनेक ठिकाणी भूस्खलन झाल्याने मंदाकिनी नदीच्या प्रवाहात अडथळे निर्माण झाले तसेच काही ठिकाणी तात्पुरती तळी निर्माण झाली. अतिवृष्टीमुळे पाण्याचा दाब वाढला. त्यामुळे गांधी सरोवरातील व तयार झालेल्या तात्पुरत्या तळ्यांमधील पाणी सर्व अडथळे दूर सारून वेगाने वाहिले आणि अचानक गंभीर पूरस्थिती (म्हणजे 'फ्लॅश फ्लड') निर्माण झाली.



केदारनाथ इथे जे घडले त्यामागे 'ग्लेशियल लेक आउटबर्स्ट फ्लड' या प्रक्रियेतून निर्माण होणारा कार्यकारणभाव होता. म्हणजे, हिमालयातील 'ग्लॅसिअर' मंदगतीने पुढे सरकत असताना आपल्याबरोबर माती, दगड असे सर्व काही वाहून आणत असतात. नैसर्गिक उंचवट्यामुळे/ अडथळ्यांमुळे त्यांचा मार्ग खुंटतो व त्या हिमनदीचे रुपांतर तळ्यात होते. उन्हाळ्यात बर्फ वितळतो. या दरम्यान जर मोठा पाऊस पडला तर या तळ्यामध्ये जास्त पाणी जमते. मग पाण्याचा दाब वाढतो आणि अशा वेळी समोरचा अडथळा मोडून पाणी जोराने वाहू लागते आणि त्याबरोबर दगड, माती सर्व काही वाहून येते. २०१३ मध्ये तेथे 'ग्लेशियल लेक (चोराबारी तळे) आउट बर्स्ट' ही घटना घडली. बर्फ वितळल्याने नद्यांतील पाण्याची पातळी वाढली शिवाय मोठ्या प्रमाणावर भूस्खलन झाले. त्यामुळे हजारो पर्यटक वेगवेगळ्या ठिकाणी अडकून पडले आणि कित्येकांना प्राणास मुकावे लागले. उपग्रहामार्फत उपलब्ध झालेल्या माहितीवरून असे दिसते की, १६व १७ जून २०१३ रोजी उत्तराखंड भागांत पाऊस नेहमीपेक्षा जास्त पडण्याची शक्यता होती; तरी ती अगदीच अनपेक्षित बाब नव्हती. ढगफुटीचा अंदाजही काहींनी वर्तविला होता. सर्वांत जास्त सरासरी पाऊस हा २० मिलीमीटर प्रति तास याप्रमाणे काही तास पडला होता.

अतिवृष्टीमुळे मंदाकिनी नदी दुथडी भरून वाहिली आणि नदीच्या प्रवाहाला प्रचंड वेग मिळाला. हे पाणी एकाच मार्गाने नव्हे तर अनेक मार्गांनी वाहिले. पूर्वी नदीचे पाणी ज्या मार्गांनी वाहिले होते मात्र गेल्या काही वर्षांपासून जे मार्ग काही भौगोलिक कारणांमुळे निसर्गतः खंडित झाले होते, त्या जुन्या मार्गांवरूनदेखील पाण्याचा प्रवाह जोरात वाहिला. शिवाय, पाण्याचे नवे प्रवाहही तयार झाले. भूस्खलन व पाण्याबरोबर वाहून आलेली माती, दगड-धोंडे, गाळ इत्यादींमुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली. नद्यांच्या परिसरात विकासविषयक जी धोरणे राबवली गेली त्यात नियोजनाचा अभाव होता. बांधकामांमुळे राडारोडा निर्माण झाला होता. नदीचा प्रवाह खंडित झालेल्या ठिकाणी बांधकामे करण्यात आली होती. अतिवृष्टीमुळे नदीचा प्रवाह या मार्गाने वळला पण राडारोड्यामुळे त्याला योग्य दिशा मिळाली नाही.

या शिवाय, या परिसरात विविध कारणांसाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाल्याने जमिनीची धूप मोठ्या प्रमाणावर झाली. त्यामुळे पाणी धरून ठेवण्याची जमिनीची क्षमता घटली. त्यामुळे नदीचे पाणी आधी जेथून वाहिले त्या जुन्या मार्गावरूनही पाणी वाहिले आणि पाण्याला वाट करून देण्यासाठी नवीन मार्गही तयार झाले. अतिवृष्टीमुळे सर्व परिसर जलमय झाला, 'पाणीच पाणी चोहोकडे' असे तर झालेच; शिवाय, अनेक ठिकाणी पाण्याची पातळी १ ते ३ मीटरने वाढली.

आता हिमनदीच्या अभ्यासात महत्त्वाची ठरलेली बाब म्हणजे पाण्याबरोबर वाहून आलेल्या माती, दगड-धोंडे, गाळ इत्यादींमुळे हिमनदीच्या पृष्ठभागावरही परिणाम झालेले आढळत आहेत. त्यामुळे या दुर्घटनेच्या आधीची हिमनदी व आताची हिमनदी यांतही लक्षणीय बदल संभवतात. 'ग्लॅसिअर'बाबत जाणून घेताना हिमालयातील भौगोलिक परिस्थितीकडे एक नजर टाकणे आवश्यक ठरते. मंदाकिनी नदीचा उगम चोराबारी हिमनदीमधून होतो. चोराबारी तळेही याच परिसरात आहे. सरस्वती नदीचा उगम कम्पॅनिअन हिमनदीमधून होतो. केदारनाथ परिसरात मंदाकिनी नदी सरस्वती नदीला जाऊन मिळते. केदारनाथ इथे मधुगंगा आणि दूधगंगा या दोन उपनद्या मंदाकिनी नदीला येऊन मिळतात. सोनगंगा ही मोठी उपनदी वासुकी तलावातून उगम पावते आणि सोनप्रयाग इथे मंदाकिनी नदीबरोबर तिचा संगम होतो. ही सर्व ठिकाणे समुद्रसपाटीपासून किती उंचीवर आहेत, तेथील जमीन कशी आहे, हवामान कसे आहे इत्यादी अनेक बाबींवर तेथील नैसर्गिक घडामोडी अवलंबून असतात. समुद्रसपाटीपासून अधिक उंचीवर असलेल्या ठिकाणी हिमनदीवर कसकसे परिणाम होतात तसेच तिथे पडणारा पाऊस आणि बर्फाचे वितळणे या बाबीही महत्त्वाच्या ठरतात. समुद्रसपाटीपासून ३८०० मीटरपेक्षा अधिक उंचीवर बर्फाळ पटट्यातील घडामोडी (glacial processes) प्रमुख भूमिका बजावतात तर, २८०० ते ३८०० मीटर असलेल्या ठिकाणी बर्फ आणि हिमनदीशी संलग्न घडामोडी (glaciofluvial processes) प्रमुख भूमिका बजावतात. मंदाकिनी नदीचे खोरे हे अशाच घडामोडींद्वारे (glaciofluvial processes) तयार झाले आहे.



हिमनदीचे मंदगतीने सरकणे, सरकताना दगड, माती इत्यादी वाहून आणणे, त्या दरम्यान अतिवृष्टी होणे आणि हिमतळे फुटणे (चोराबारी तळे) अशासारख्या घडामोडींमुळे मोठ्या हिमनदीबरोबर त्यांना येऊन मिळणा-या छोट्या हिमनद्या यांवरही परिणाम होतात. कधी कधी हिमनदीमध्ये दरी/खोरे तयार होते. कधी कधी मातीच्या ढिगा-याचे कोन तयार होतात तर कधी खांबाकृती निर्माण झालेल्या दिसतात. कुठे गाळाचे खडक बनतात. गाळ व दगड, माती साचून मूळची रचना बदलली जाते. त्यामुळे हिमनदीवर होणारे विविध परिणाम जाणून घेण्यात सातत्य असणे गरजेचे ठरते. महत्त्वाची बाब अशी की हिमनदीमध्ये सतत बदल होत असल्याने हिमनदी- विषयक अभ्यासांतून वेगवेगळ्या बाबी पुढे येऊन वेगळे निष्कर्ष मांडले जाऊ शकतात. निसर्गातील घडामोडींचा अभ्यास विविध प्रकारे केला तरी काही बाबी नेमक्या स्पष्ट होतीलच असे नाही. अशा परिस्थितीत अतिवृष्टी, पूर यांबाबतचा नेमका अंदाज देणा-या पद्धती विकसित होण्याची गरज भासते.

गेल्या वर्षी जून महिन्यात केदारनाथ येथे नैसर्गिक संकट कोसळले तेव्हा नेहमीपेक्षा जास्त पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. तरी पाऊस किती प्रमाणात व कसा पडेल याचा नेमका अंदाज आलेला नव्हता. एखादी घटना घडू शकते असे सांगणे आणि घटनेची तीव्रता कशा प्रकारची असेल हे सांगणे यांत फरक असतो. पावसाच्या अंदाजाबाबत असेच काहीसे घडते. विविध अभ्यासशाखांमधील आणि विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे अतिवृष्टीचा वा पूराचा अंदाज वर्तविण्याबाबत प्रगती झाली असली तरी असे संकट किती गंभीर होऊ शकते हे सांगणे अवघड ठरले आहे. त्यातच हवामानशास्त्र (meteorology) आणि जलशास्त्र (hydrology) या दोहोंशी संबंधित घटकांचा सर्वकष विचार करून योग्य अंदाज बांधणे आव्हानाचे ठरते. केदारनाथ येथील नैसर्गिक संकटांनंतर अभ्यासकांनी hydrological and hydraulic simulation study असा अभ्यास करून काही बाबी पुढे आणल्या आहेत. अभ्यासकांच्या भाषेत हे नैसर्गिक संकट 'अचानक कोसळलेली गंभीर पूरस्थिती' ('फ्लॅश फ्लड') या गटात मोडते. थोड्या कालावधीत प्रचंड पाऊस व त्यामुळे विनाश हे 'फ्लॅश फ्लड'चे वैशिष्ट्य.

केदारनाथ परिसरातील 'फ्लॅश फ्लड'मागे अतिवृष्टी, चोराबारी तळ्याचे पाणी वेगाने वाहणे आणि तीव्र उतार या महत्त्वाच्या बाबी ठरल्या आहेत, असे अभ्यासकांनी नमूद केले आहे. चोराबारी हिमनदी मंदगतीने पुढे सरकत असताना नैसर्गिक अडथळ्यांमुळे चोराबारी तळे तयार झाले. अतिवृष्टी आणि बर्फ वितळून त्यातील पाणीसाठ्यात वाढ झाली आणि पाण्याचा दाब वाढल्याने सर्व अडथळे मोडून पाणी वेगाने वाहिले. अतिवृष्टी होईल असा अंदाज वर्तविण्यात आला असला तरी अशा काही घटना निसर्गतः घडतील याचा अंदाज आलेला नव्हता. या सर्व घटनांमुळे तिथे अचानक गंभीर पूरस्थिती ('फ्लॅश फ्लड') उद्भवली. केदारनाथ परिसरातील तीव्र उतारांमुळे तेथील संकट अतिगंभीर बनले. पाण्याच्या प्रवाहाचा मूळचा वेग जास्तच होता आणि तीव्र उतारामुळे तो अधिक वाढला. त्यामुळे मोठे दगड, माती, गाळ व नदीपात्रानजीकच्या बांधकामातील राडारोडा वाहून येण्याचे प्रमाण वाढले.

पावसाबाबतच्या आकडेवारीवरून असे आढळते की, केदारनाथच्या परिसरात २००७ ते २०१२ या कालावधीत जून महिन्यातील पावसाची सरासरी २०० मिलिमीटर इतकी राहिली आहे. मात्र १४ ते १८ जून २०१३ या काळात तेहरी, उत्तरकाशी, थराली आणि जाकोली इथे अनुक्रमे २८१, ३५९, ३२६ आणि ३९० मिलिमीटर इतका पाऊस पडला असे हवामान विभागातील आकडेवारीवरून स्पष्ट होते. अनेक ठिकाणी भरपूर पाऊस पडला पण पावसाची नोंद करणारी काही ठिकाणची केंद्रेच वाहून गेल्याने पावसाबाबतची संपूर्ण आकडेवारी उपलब्ध झालेली नाही, असे अभ्यासकांनी नोंदवले आहे. अलकनंदा व भागिरथी नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात १५ ते १७ जून २०१३ या काळात दरदिवशी पडणा-या पावसाचे प्रमाण ५० ते २०० मिलिमीटर असे होते. अलकनंदा नदीच्या पाणलोट क्षेत्रात १० ते १८ जून २०१३ या काळात पडलेल्या पावसाचे एकूण प्रमाण ५३० मिलिमीटर इतके होते तर भागिरथी नदीच्या पाणलोट क्षेत्रात हेच प्रमाण ५५० मिलिमीटर इतके होते. या कालावधीत केदारनाथ परिसरात पावसाचा जोर इतका प्रचंड होता की मातीतील आर्द्रता कमाल पातळीवर पोहचली. त्यानंतर पावसाचे पाणी जोराने वाहून गेले.



या परिसरातील आणखी एक उल्लेखनीय घटना म्हणजे तिथे जून २०१३ मध्ये बर्फ पडण्याचे प्रमाण ३० टक्क्यांनी वाढले होते साधारणपणे तिथे जून महिन्यात बर्फ पडण्याचे एवढे प्रमाण नसते. पण वातावरणातील काही बदलांमुळे बर्फ पडले असावे व ते बर्फ वितळल्याने पाण्याची पातळी अधिक वाढली असावी. पाऊस पडण्याआधी मंदाकिनीचा 'येवा' (म्हणजे प्रवाहाचा वेग आणि एकूण वाहता पाणीसाठा) लक्षात घेतला तर बर्फ वितळल्याने पाण्याचा साठा व वेग वाढला असावा असे अभ्यासकांनी नोंदले आहे. मंदाकिनीच्या उपनद्यांमधील 'येवा'ही इथे महत्त्वाचा ठरतो. नैसर्गिक संकटांनंतर घेतलेल्या उपग्रह चित्रांवरून असे दिसते की नद्यांकाठचा परिसर पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला आहे. दगड, माती, गाळ वाहून आल्याने काही ठिकाणी त्यांचे ढिगारे उभे राहिले.

येथून पुढे अशा घटनांना सामोरे जाण्यासाठी 'फ्लॅश फ्लड'चा अंदाज वर्तवता येईल का, या दृष्टीने अभ्यास-संशोधन करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने अभ्यासात नव्या 'मॉडेल'चा विचार करण्याची आवश्यकता आहे. तसेच अशा घटना घडतात तेव्हा त्या वेगाने घडतात आणि कोणतीही उपाययोजना करण्यासाठी संबंधितांच्या हाती असलेला वेळ थोडा असतो याचाही विचार करण्याची गरज आहे, असे मत अभ्यासकांनी मांडले आहे. या सर्व घडामोडींच्या संदर्भात हिमनदीच्या पृष्ठभागाची ठरावीक दिशेने होत असलेली हालचाल (velocity) अभ्यासणे गरजेचे ठरते. वातावरणातील बारिकसारीक बदलांचा परिणाम हिमनदीवर होत असतो. शिवाय, जागतिक तापमानवाढीचे गंभीर संकट जगापुढे उभे ठाकले आहे. तापमानवाढीमुळे बर्फाळ प्रदेशातील बर्फ वितळण्याच्या शक्यता वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत तसेच मॉन्सूनच्या कालावधीत होणारे वातावरणातील बदल लक्षात घेऊन 'फ्लॅश फ्लड'चा अंदाज वर्तवता येईल का, याचाही विचार नव्या 'मॉडेल'मध्ये होणे गरजेचे ठरावे, असे मत अभ्यासक मांडतात.

निसर्गातील विविध घटनांचा अभ्यास जगभरातील तज्ज्ञ आपापल्यापरीने करीत आहेत. त्यामुळे काही उपाययोजना आखणे कदाचित शक्य होईलही. पण, मानवी कृतींमुळे निसर्गात होणारा बिघाड टाळण्याचे प्रयत्न कसोशीने होणे गरजेचे ठरते. ■■

## पर्यावरण २

# धोके ओळखा व टाळा !

वातावरणातील बदल आणि पृथ्वीचे वाढते तापमान हे शब्द आता सर्वांच्या परिचयाचे झाले आहेत. 'इंटरगव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज'च्या (IPCC) विविध अहवालांमुळे यासंबंधीचे अनेक तपशील जगभरातील अनेक देशांमध्ये पोहचले आहेत. IPCC च्या अलीकडेच मांडण्यात आलेल्या पाचव्या अहवालात वातावरणातील बदलांबाबत अधिक काही मुद्दे मांडण्यात आले आहेत. पर्यावरणीय बदल, त्यांमुळे उभे ठाकणारे संभाव्य धोके आणि त्यांना सामोरे जाण्यासाठी आखावयाची धोरणे या मुद्दयांना धरून हा अहवाल मांडण्यात आला आहे. पर्यावरण रक्षणाची गरज, उपलब्ध पर्याय, संधी, येणा-या अडचणी व असणा-या मर्यादा, या संदर्भात अपेक्षित असलेली लवचीकता इत्यादींची दखल या अहवालाने घेतली आहे. विशेषतः, पर्यावरणविषयक धोरणे आखणे व घेतलेले निर्णय राबवणे यासाठी मुख्य संभाव्य धोक्यांचा सर्वंकष विचार करणे आवश्यक ठरते. धोके ओळखणे व ते टाळणे हे गरजेचे ठरते. ध्रुवीय प्रदेश, उत्तर अमेरिका, मध्य व दक्षिण अमेरिका, युरोप, आफ्रिका, आशिया, ऑस्ट्रेलिया आणि महासागरांमधील छोटी बेटे अशी भौगोलिक विभागणी करून वरील मुद्यांचा ऊहापोह अहवालात करण्यात आला आहे.

समुद्राकाठी असलेली गावे/शहरे, महासागरांमध्ये विखुरलेली छोटी बेटे यांना सर्वांत जास्त धोका आहे तो समुद्रातील पाण्याची पातळी वाढण्याचा. या शिवाय, पूर आणि वादळे यांमुळेही तेथे संकटे निर्माण होऊ शकतात. अशा परिस्थितीत तेथील रहिवाशांचे दैनंदिन जीवनव्यवहार अडचणीत येऊशकतात. त्याचबरोबर त्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम संभवतात. समुद्रानजीकच्या परिसरातही असे घडण्याच्या शक्यता वाढतात. वातावरणातील बदलांमुळे विविध ठिकाणचे ठरावीक निसर्गचक्र बिघडून पूर, वादळे, तापमानात चढउतार अशा घटना घडून येण्याचा धोका असतो. नैसर्गिक आपत्तींमुळे विद्युतपुरवठा खंडित होण्याची शक्यता मोठी असते.



त्याशिवाय, संपर्क यंत्रणा निकामी होणे, पाणीपुरवठा विस्कळित होणे संकटात अडकलेल्या नागरिकांना मदत वेळेवर न पोहचणे इत्यादी बाबी उपस्थित होतात. सर्व प्रकारच्या अत्यावश्यक सेवा मिळणे दुरापास्त होते. निसर्गचक्र बिघडल्याने काही ठिकाणी उन्हाची तीव्रता वाढते, तर कधी अनियमित व मुसळधार पाऊस पडतो. अशा वेळी शहरी वा ग्रामीण भागांत घराबाहेर काम करणा-यांचे आरोग्य बिघडू शकते, रोगराई वाढून मृत्युदर वाढण्याचा धोका असतो. अन्नधान्याचे उत्पादन, साठवणूक व उपलब्धता या सर्व बाबींवर याचा परिणाम होतो. निसर्गचक्र बिघडल्यास कृषीक्षेत्र व त्याच्याशी संलग्न व्यवसायही अडचणीत येतात. ग्रामीण भागात कृषिक्षेत्रावर अवलंबून असणा-या नागरिकांच्या रोजीरोटीचा प्रश्न गंभीर बनतो. अखेरीस उपजीविकेसाठी त्यांना शहरांचा मार्ग धुंडाळावा लागतो. अर्थउद्योगांमुळे वाढलेल्या शहरांमधील वाढत्या गर्दीत यामुळे भरच पडते. शहर व्यवस्थापन कोलमडते. या बाबींचा त्रास वंचित घटकांना अधिक प्रमाणात होऊ शकतो.

निसर्गचक्र बिघडल्याने ठिकठिकाणची जैविक विविधता धोक्यात येते. सागरी परिसंस्थांवर विपरीत परिणाम होतो. वृक्षतोड झाल्याने वनसंपत्तीचा ऱ्हास होतो. सतत वाढणा-या वेगवेगळ्या प्रदुषणांमुळे शहरी व ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याचे स्रोत दूषित बनतात. पिण्याचे स्वच्छ पाणी मिळणे दुरापास्त होण्याच्या शक्यता वाढतात. जगभरात अनेक ठिकाणी पाण्याचा प्रश्न उग्र रूप धारण करू पाहतो आहे. त्या शिवाय, महासागरांमधील छोट्या बेटांवर तर हा प्रश्न अधिक गंभीर ठरू शकतो. हे सर्व धोके लक्षात घेतले तर वातावरणातील बदल व पृथ्वीचे वाढते तापमान या बाबी संपूर्ण जगासाठी काळजीच्या ठरल्या आहेत.

या सर्व घडामोडींचे आर्थिक परिणाम जागतिक पातळीवर कसकसे होत आहेत याबाबत अजून नेमका अंदाज मांडणे कठीण असल्याचे म्हटले जाते. मात्र, पर्यावरणविषयक समस्यांमुळे चालू शतकात आर्थिक विकासाची गती मंदावण्याची शक्यता असल्याचे अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे गरिबीचे प्रमाण कमी करण्याचे आव्हान असणारच आहे. आशियातील देशांना कोणत्या समस्या भेडसावू शकतात व त्याबाबत काय करता येईल याचा ऊहापोह पुढील तक्त्यात मांडला आहे.

| वातावरणातील बदल कृतियोजना (आशिया) | | |
|---|---|---|
| प्रमुख धोके | संबंधित घटक | धोरणे/कृतियोजना |
| ●नदीकाठाजवळील व सागरी किनारपट्टयांजवळील गावे/शहरे इथे पूरस्थिती उद्‌भवणे, पायाभूत सोयीसुविधांचे नुकसान, मानवी वस्तीला धोका | ● चक्रीवादळे, समुद्रातील पाण्याची पातळी वाढणे, अतिवृष्टी | ●संरचनात्मक व बिगर संरचनात्मक उपाय योजणे, जमिनीचा काटेकोर व सुयोग्य आणि प्रभावी वापर, काळजीपूर्वक व निवडक स्थलांतर/पुनर्स्थानांकन ●पाणीपुरवठा, वीजपुरवठा, अन्नपुरवठा, दळणवळण, परिसंस्था, कचरा व्यवस्थापन इत्यादी बाबी संकटकाळीही कार्यान्वित राहतील याची दक्षता ●संकटांची पूर्वसूचना देण्याच्या पद्धती, तसेच संकटे कुठेकुठे येण्याची शक्यता आहे ते समजून घेऊन त्यानुसार कृतियोजनांची आखणी ●विविध उद्योगांना चालना |
| ●उष्णतेच्या लाटा/ तीव्र उष्मा त्यामुळे आरोग्यहानी व प्राणहानी | ● अतितापमानवाढ | ●उष्मा/ तापमान वाढण्याच्या पूर्वसूचना व त्यानुसार आरोग्याची काळजी घेण्याची दक्षता ●पर्यावरणीय समतोल राखणारी सातत्यपूर्ण गावे/ शहरे असावीत यासाठी विशेष प्रयत्न, शहरांमधून वनराईचे प्रमाण वाढवून उष्मा/तापमान कमी राहील याची काळजी घेणे |



| तक्ता - वातावरणातील बदल कुठे, कसे व कृतीयोजना | | |
|---|---|---|
| प्रमुख धोके | संबंधित घटक | धोरणे/कृतीयोजना |
| ●दुष्काळ व पाणीटंचाई, अन्नधान्याचा तुटवडा, कुपोषण | ● अतितापमानवाढ, शुष्क व कोरडे वातावरण | ●संकटाची पूर्वसूचना देणा-या यंत्रणा आणि स्थानिक पातळीवर करावयाच्या उपाययोजना, एकात्मिक जलसंधारण योजना, पाणीसाठे तयार करणे, पाण्याची काटकसर व पुनर्वापर, पाण्याचा सुयोग्य, नेटका वापर, शेती करण्याच्या पद्धतीत बदल, |

पर्यावरणीय बदलांची दखल वेळेवर घेणे व त्यानुसार योग्य उपाययोजना करणे किती गरजेचे आहे, ते या तक्त्यावरून दिसून येते. ध्रुवीय प्रदेशात बर्फ वितळणे व त्यामुळे तेथील परिसंस्था अडचणीत येणे असे घडण्याची शक्यता आहे. अल्प प्रमाणात तसे कुठे कुठे घडतेही आहे. विशेषतः, बर्फाळ प्रदेशातील 'परमाफ्रॉस्ट'ची हानी होण्याने काही प्रश्न निर्माण होत आहेत. उत्तर अमेरिका, मध्य व दक्षिण अमेरिका, युरोपीय देश व ऑस्ट्रेलिया या सर्वच ठिकाणी कोणते ना कोणते प्रश्न उभे ठाकत आहेत. युरोपीय देशांमध्ये काही माशांच्या प्रजाती अडचणीत येत आहेत तर ऑस्ट्रेलियात प्रवाळांचा ('कोरल रीफ') प्रश्न गंभीर आहे. तेथील सागरी परिसंस्था धोक्यात येते आहे. पण लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे महासागरांमधील छोट्या बेटांचे प्रश्न अधिकच गंभीर बनू पाहत आहेत. समुद्रातील पाण्याची पातळी वाढल्याने त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. अशा परिस्थितीत तेथील नागरिकांना स्थलांतर करावे लागेल अशी चर्चा आहे. या शिवाय, तिथे पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही ऐरणीवर येऊ लागला आहे.

आर्थिक विकासाला महत्त्व देतानाच पर्यावरणाचा समतोल राखणारी सुसंवादी आणि नियोजनपूर्ण धोरणे आणि ठोस कृती यांना महत्त्व देण्याचे आव्हान आता सर्वच राष्ट्रांपुढे आहे. ■■

सामाजिक

# विषमतेची बाजारपेठीय रूपे

*"मी धोबी वस्तीमध्ये राहतो हे कळल्या कळल्या माझे कर्जप्रकरण हाताळणा-या त्या अधिका-याचे वागणे-बोलणे बदललेच. आधुनिक धर्तीवरील लॉन्ड्री हाताळणे तुला जमणार नाही, त्यांत तू अयशस्वी ठरशील असे तो मला समजावून सांगू लागला. या खटाटोपात माझे सारे पैसे पाण्यात जातील, हेही मला पटवण्याचा तो प्रयत्न करत होता. आजवर ज्या प्रमाणे मी नदीच्या काठावर कपडे धुवत आलो तोच परिपाठ पुढेही चालू ठेवावा असा त्याचा सल्ला होता. नदीवर कपडे धुवायचे आणि मग इस्त्री करून त्या त्या गि-हाइकाला त्याचे कपडे घरी नेऊन द्यायचे, ही माझी पूर्वापारची रीत मी तशीच चालू ठेवावी, हे तो मला सांगत होता. घरोघरी फिरून कपडे जागेवरच इस्त्री करून देता यावेत यासाठी माझ्या मुलाला मी दोन चाकांची एक ढकलगाडी घेऊन द्यावी, अशीही पुस्ती त्याने पुढे जोडली. त्यामुळे चार पैसे अधिक मिळतील अशी मल्लीनाथीही त्याने केली.... आता, गोमतीच्या काठावर गि-हाइकांचे कपडे धुवतच माझ्या वाडवडिलांनी त्यांची हयात घालवली म्हणून मी आणि माझ्या मुलानेही तसेच करावे, असे तुमचे म्हणणे आहे का ? इतःपर लोकांची धुणी नदीकाठावर धुवायची नाहीत, अशी पक्की खूणगाठच मी माझ्या मनाशी बांधलेली आहे. ज्याला कोणाला आपले कपडे धुवून आणि स्टार्च करून हवे असतील त्यांनी त्यांचे कपडे घेऊन माझ्या दुकानी यावे. दारोदार हिंडून धुलाईचे कपडे प्रथम गोळा करावयाचे आणि ते धुवून नंतर इस्त्री करून पुन्हा ज्याला त्याला घरोघर नेऊन द्यावयाचे, हे सगळे मी आता या पुढे करणार नाही".*

● ***लखनौमध्ये राहणारा धोबी जमातीतील एक लॉन्ड्रीमालक***

निखळ स्पर्धेच्या तत्त्वानुसार कार्यरत राहणारी बाजारपेठीय अर्थव्यवस्था जात, धर्म, पंथ, लिंग, भाषा, वर्ण या कशाचाही विचार न करता व्यक्तीच्या ठायी वसणा-या कौशल्यांचीच काय तेवढी बूज राखते आणि ज्याच्या त्याच्या पदरात त्याच्या त्याच्या क्षमतेनुसार लाभालाभांचे माप घालते, या धारणेला समूळ छेद देणारा हा अनुभव.



भारतीय समाजव्यवस्थेतील तथाकथित मागास समजल्या गेलेल्या समाजसमूहांमधून पुढे आलेल्या अनेक उद्योजकांना हा अनुभव नवीन नाही. आपल्या देशात उदारीकरणाचे युग अवतरल्यानंतर समाजाच्या विविध स्तरांतील उद्यमशीलतेला धुमारे फुटण्यास अनुकूल अवकाश प्राप्त झाला, असे प्रतिपादन वारंवार केले जाते. त्यांतूनच, आर्थिक विकासाची प्रक्रिया सर्वसमावेशक बनण्याचा मार्गही प्रशस्त बनतो आहे, अशीही पुस्ती जोडली जाते. बाजारपेठीय अर्थकारणाच्या विस्ताराद्वारे भारतीय समाजामध्ये पूर्वापार चालत आलेल्या सामाजिक विषमतेचा संकोच घडून येईल अथवा यावा अशी आशावजा शक्यताही मुखर होताना दिसते. परंतु, या संदर्भात समाजशास्त्रज्ञांनी क्षेत्रीय पाहणीद्वारे अलीकडील काळात केलेली संशोधने मात्र वेगळेच चित्र पुढ्यात मांडतात. सामाजिकदृष्ट्या निम्नस्तरावर अनंत काळ ढकलल्या गेलेल्या समाजसमूहांतील उभरत्या उद्योजकांना बाजारपेठीय अर्थकारणाच्या माहौलातदेखील विषमतापूर्ण व्यवहारांना नाना प्रकारे आजही तोंड द्यावे लागते, असा या अभ्यासांचा निष्कर्ष आहे.

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**
**यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५** **किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

**_भाव पाडून माल विकावा लागतो..._**

*जिवापाड कष्ट उपसून माझा हा व्यवसाय मी आज उभा केलेला आहे. एका स्थानिक व्यापा-याकडे त्या आधी मी चाकरीला होतो. गि-हाइकांच्या मागणीनुसार त्यांना घरोघर माल नेऊन पोहोचविणे, हे त्या वेळी माझे मुख्य काम असे. आपण आपला स्वतःचा व्यवसाय सुरू करावा, असा विचार हळूहळू माझ्या मनात पुढे उमटायला लागला. यथावकाश मी व्यवसाय सुरू ही केली. नाना प्रकारचे खाद्यपदार्थ घरीच तयार करण्यास माझ्या बायकोने मग सुरु वात केली. माझ्या दोन मुलीही तिला घरी मदत करत असत. ते सारे घरगुती खाद्यजिन्नस शहरातील दुकानदारांना पुरवण्यास मग आम्ही सुरु वात केली. मात्र, बाजारपेठेत बस्तान बसवणे ही खरोखरच कसोटी पाहणारी गोष्ट होती. आम्ही तयार केलेला माल शहरातील मारवाडी दुकानदार विकत घेत नाहीत, ही बाब माझ्या ध्यानात आली. प्रत्यक्षात माझ्या तोंडावर तसे कोणी कधी स्पष्ट काही बोलले नाही मात्र माझी जात कनिष्ठ स्तरात मोडत असल्यामुळेच मी तयार केलेले घरगुती पदार्थ ते खरेदी करत नसावेत, हे मी ताडले. पण एक मात्र खरे. पैशाची ताकद अफाट असते. आमची उत्पादने बाजारपेठेतील प्रचलीत दरांपेक्षा कमी भावाने विकण्यास मग मी सुरु वात केली. माझ्याकडून माल खरेदी करण्यास मग अनेक दुकानदार पुढे आले. आता हे सगळे सुरळीत चालू आहे. परंतु, प्रचलीत बाजारभावांनुसार माझा माल विकायला मी सुरु वात केली तर माझ्याकडून मालाची खरेदी करण्यास कोणीही तयार होणार नाही, हेही तितकेच खरे !*

**_• खाद्यपेयांचा जयपूर येथील एक ठोक विक्रेता_**

अडथळ्यांच्या मालिकेला सुरु वात होते तीच मुळी उद्योगासाठी कर्ज मिळण्यातील विघ्नांपासून. अनुसूचित जातसमूहांमधून पुढे येणा-या उद्यमशील होतकरूंना बँकांसारख्या अधिकृत भांडवल पुरवठादार संस्थांकडून कर्जरूपाने भांडवल मिळवण्यातच नाना खेकटी उभी राहतात. शहरांतर्गत निवासी प्रभागांची जातवार रचना पक्की असेल तर अर्जदाराने सादर



केलेल्या अर्जावरील पत्ता बघूनच अर्जदार कोणत्या जातसमूहाचा घटक असावा, याचा कयास बँकेतील अधिकारी बांधतात. मग त्या होतकरू उद्यमशील माणसाच्या अंगी असणारी कौशल्ये, हिंमत, अनुभव, पतधारण क्षमता, तारण ठेवण्याची त्याची ताकद... अशांसारख्या सगळ्या बाबी गौण ठरतात. बलिष्ठ ठरतो तो त्या अर्जदाराचा सामाजिक स्तर !

व्यवसायासाठी बँकांकडून कर्ज मंजूर करवून घेण्यात यश आलेल्या अनुसूचित जातसमूहांतील ज्या उद्योजकांची अभ्यासकांनी पाहणी केली त्यांतील जवळपास ३५ टक्के उद्योजकांनी त्यांचे कर्जप्रकरण बँकेकडून मंजूर करून घेण्यासाठी पुढीलपैकी एक अथवा एकापेक्षा अधिक पर्यायांचा अवलंब केल्याचे ध्यानात येते. ते पर्याय म्हणजेः (१) ज्या बँकेमध्ये कर्जप्रकरणासाठी अर्ज करायचा त्या बँकेमध्ये कर्जदाराचा एखादा नातेवाईक नोकरीला असेल तर त्याचा वशिला वापरून कर्जप्रकरण मंजूर करून घेणे. (२) बँकेतील संबंधित कर्मचा-यांशी 'अर्थ'पूर्ण व्यवहार करून कर्ज पदरात पाडून घेणे. (३) दाखल केलेले कर्जप्रकरण मंजूर व्हावे यासाठी स्थानिक राजकीय शक्तींचा दबाब संबंधित बँकेवर आणणे. (४) उच्च जातीच्या व्यक्तीस व्यवसायामध्ये भागीदार करून घेणे व त्याच्यामार्फत बँकेकडून कर्जसुविधा पदरात पाडून घेणे. अशा प्रकरणांमध्ये एक बाब अनेक ठिकाणी प्रकर्षाने लक्षात आलेली आहे. ती अशी की, केवळ तडजोड म्हणून उच्च जातीच्या व्यक्तीला भागिदारीच्या तत्त्वावर धंद्यामध्ये सहभागी करून घेतले तरी व्यवहारात त्या व्यवसायाची सारी सूत्रे निम्न जातसमूहातील प्रवर्तकाच्या हातून निसटतात आणि उच्च जातसमूहातील भागिदाराच्या हातात एकवटतात. त्या धंद्यात मग अनुसूचित जातसमूहातील भागिदाराची भूमिका निव्वळ व्यवस्थापक अथवा तत्सम मध्यमस्तरीय अधिकारी अशीच व तेवढीच राहते. (५) स्थानिक परिसरातीला एखाद्या सेवाभावी अथवा स्वयंसेवी संस्थेशी संधान बांधून तिच्या मध्यस्थीने कर्जप्रकरण बँकेकडून मंजूर करून घेणे.

धंदा चालू केल्यानंतरही अनुसूचित जातसमूहांतील उद्योजकांना प्रस्थापित बाजारपेठेत शिरकाव करून स्वतःचे बस्तान बसवताना नाना अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. त्यांत पुन्हा मुख्य धोंड असते ती जातीयतेचीच.

धंद्याच्या यशामध्ये त्याचे ‘लोकेशन’ हा मोठा महत्त्वाचा घटक ठरतो. अनसूचित जातसमूहांतील उद्योजकांच्या पदरी याहीबाबतीत प्रतिकूल दानच पडते. सगळी मोक्याची ‘लोकेशन्स’ उच्च जातींच्या ताब्यात असतात.

### *उधारीबाबत ठोक विक्रेत्यांकडून अडवणूक*

*सफाई कामगार म्हणून शहराच्या आर्यनगर भागात मी काम करत असे. रस्त्याच्या कडेला असणारी सार्वजनिक गटारे स्वच्छ ठेवणे, हे माझे काम. यथावकाश, अनुसूचित जातींमधील घटकांसाठी राखीव असलेल्या कोट्यामधून महानगरपालिकेने मला आर्यनगर भागातच एक दुकान घालून दिले. परंतु, व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या खाद्यतेल, लोणी, चहा यांसारख्या जिनसा उधारीवर पैदा करणे, ही धंद्यातील एक मोठीच धोंड होऊन बसली. या जिनसांचे ठोक विक्रेते मला उधारीवर मालच देत नसत. जातीने मी सफाई कामगार असल्याने आणि माझे दुकान मात्र उच्चजातीच्या समाजांचे संख्यात्मक प्राबल्य असलेल्या भागात असल्यामुळे माझा धंदा तेजीत चालणार नाही, अशी ठोक विक्रेत्यांची भावना. त्यांची ती धारणा बरोबरच होती, असे मला आता जाणवते. माझ्याकडे येणा-या गि-हाइकांमध्ये माझे सफाई कामगार मित्रच बहुसंख्येने असत. सकाळचे काम आटोपले की चहा आणि भजी खाण्यासाठी ते माझ्या दुकानी येत असत. धंद्यात नफा काही फारसा होत नसे. मग ते दुकान मी भाड्याने दिले आणि आता या खाटिक कॉलनीमध्ये मी दुसरे दुकान उघडले आहे. जातीचे ओझे पाठुंगळी वागवण्याच्या जाचातून माझी त्यामुळे सुटका झाली. इथे माझी गि-हाइकेही वाढली आहेत. ठोक विक्रेत्यांकडून मला काही मालही आता उधारीवर मिळू लागलेला आहे. परंतु, तिथेही पुन्हा फरक केला जातोच. उधारी फेडण्यासाठी इतरांना मुदत मिळते १४ दिवसांची आणि मला मात्र मुदत दिली जाते केवळ सातच दिवसांची. त्या मुदतीत जर मला उधारी फेडता आली नाही तर थकबाकीवर मला सहा टक्के दराने व्याज भरावे लागते.*

***• कानपूर येथील एक चहा दुकानदार***



सामाजिकदृष्ट्या निम्नस्तरांतील व्यावसायिकांना मग त्यांच्या राहत्या परिसरातच व्यवसायाचा पसारा थाटणे भाग पडते. साहजिकच मग व्यवसायवाढीच्या शक्यतांना अंगभूत मर्यादांचे कुंपण पडते. हे केवळ इतक्यावरच थांबत नाही. व्यवसायाच्या मुख्य प्रवाहातून वगळले जाण्याने अनुसूचित जातसमूहांतील उद्योजक व व्यावसायिक विविध प्रकारच्या पूरक सेवा व सुविधांपासून वंचित राहतात. समव्यावसायिकांचे समूह, व्यावसायिक व्यासपीठे, व्यावसायिकांच्या संघटनांचे सदस्यत्व अशांसारख्या संस्थात्मक साखळीपासून अलग पडण्याचे व्यावसायिक तोटेही मोठे असतात. एक तर, अशा व्यासपीठे व औपचारिक/अनौपचारिक संस्था-संघटनांच्या माध्यमातून व्यावसायिक माहितीचे, बाजारपेठेशी संबंधित ज्ञानाचे जे सुलभ, सुकर व वेगवान हस्तांतरण सतत होत राहते त्यांना अनुसूचित जातसमूहांतील उद्योजक मुकतात. नव्या बाजारपेठांबाबतचे अद्ययावत ज्ञान, बाजारपेठेत प्रवेशत असलेली नवनवीन तंत्रज्ञाने, यंत्रसामग्री, सुधारित कच्चा माल यांसारख्या व्यवसायाशी निगडित अंगांसंदर्भात अशा व्यासपीठांवरून उद्योजकांचे जे सतत प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रबोधन चालू राहते त्याचा लाभ निम्न जातसमूहांतील उद्योजकांना मिळत नाही. याचा प्रतिकूल परिणाम त्यांच्या व्यावसायिक नैपुण्यावर आणि पर्यायाने व्यावसायिक कौशल्यावर घडून येतो. खुल्या बाजारपेठेतील स्पर्धात्मक व्यवहारांत मग ते आपसूकच परिघावर फेकले जातात अथवा मागे पडतात.

अनुसूचित जातसमूहांतील उद्योजकांना केवळ बाजारपेठेच्या आघाडीवरच जातसंलग्न विषमता आणि त्यांतून निपजणारा असमान व्यवहार यांचा सामना करावा लागतो असे नाही. सरकारी कामकाज आणि त्या कामकाजाशी संबंधित सरकारी विभाग व कार्यालये इथेही त्यांच्या वाट्याला विषमतापूर्ण व्यवहारच येतो, असे आजवरच्या अभ्यासांतून दिसून आलेले आहे. पोलीस, करसंकलन, वीजपुरवठा, महानगरपालिका अथवा नगरपालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्था यांसारख्या विविध स्तरांवरील सरकारी विभागांचा उद्योगांशी या ना त्या प्रकारे सतत संपर्क येत राहतो. इथेही अनुसूचित जातसमूहांतील उद्योजकांना उच्च जातसमूहांतील घटकांशी नेहेमीच विषम सामना करावा लागतो. ■■

सामाजिक

# अभ्यास, मत बनविणा-या घटकांचा...

राबविल्या जात असलेल्या विविध प्रकारच्या कल्याणकारी योजनांची वास्तवातील अंमलबजावणी कितपत कार्यक्षम आहे, हा मतदान करतेवेळी मतदारांच्या लेखी विचारार्ह मुद्दा ठरतो अथवा नाही, हा एक रोचक प्रश्न ठरतो. आपल्या देशातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत सर्वसामान्य नागरिकांसाठी जी स्वस्त धान्य योजना राबवली जाते तिची कार्यक्षमता हा मतदारांच्या निवडीवर प्रभाव टाकणारा एक महत्त्वाचा घटक असावा असे मानण्यास जागा आहे. याच व्यवस्थेला व्यवहारात आपण 'रेशन व्यवस्था' अथवा 'रेशनच्या दुकानांची यंत्रणा' असे म्हणतो. या यंत्रणेचा लाभ घेणा-या देशवासियांच्या दृष्टीने या व्यवस्थेचे फायदे दोन. रेशनवर ज्या वेळी स्वस्त (म्हणजेच अनुदानित) दराने अन्नधान्य उपलब्ध करून दिले जाते त्या वेळी त्या व्यवस्थेचा लाभ घेणा-या ग्राहक नागरिकांच्या अन्नधान्यावरील खर्चात बचत होत असते. म्हणजेच, दुस-या शब्दांत सांगावयाचे तर त्यांच्या वास्तव उत्पन्नात वाढ घडून येत असते. म्हणूनच, स्वस्त धान्य योजनेसारख्या कल्याणकारी उपक्रमांना 'उत्पन्नपूरक अथवा उत्पन्नवर्धक अध्याहृत अनुदान योजना' असे म्हटले जाते. अशा उत्पन्नवर्धक अध्याहृत अनुदानाचे आकारमान प्रत्यक्षात किती असेल हा ग्राहकांच्या जिव्हाळ्याचा विषय ठरतो. अशा योजनांद्वारे मिळणा-या लाभाचा हा पहिला प्रकार होय.

स्वस्त धान्य योजनेंतर्गत नागरिकांना अनुदानित दराने वाटप करण्यासाठी सरकार शेतक-यांकडून अन्नधान्याची खरेदी करत असते. अशी खरेदी सरकार ज्या दराने करते त्या खरेदीदराच्या पातळीत सरकार वेळोवेळी वाढ घडवून आणत असते. त्यामुळे शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ घडून येते, हे झाले अशा योजनांच्या लाभाचे दुसरे रूप. स्वस्त धान्य योजनेच्या अंमलबजावणीतील कार्यक्षमतेचा अथवा कार्यक्षमतेच्या अभावाचा प्रभाव मतदान करतेवेळी मतदारांवर पडतो अथवा नाही या बाबीचा विचार या ठिकाणी आपण ग्राहकांच्या संदर्भातच करणार आहोत.



असे करण्यामागील कारणे दोन. स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून अनुदानित दराने वाटप करण्यात येणा-या अन्नधान्य खरेदीचे लाभ तुलनेने अधिक व्यापक प्रमाणावरील ग्राहक नागरिकांच्या पदरात पडतात. हे झाले पहिले कारण. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत नागरिकांना अनुदानित दराने उपलब्ध करून देण्यासाठी शेतक-यांकडून सरकार जी अन्नधान्य खरेदी करते तिचे लाभ शेतकरी वर्गातील सर्वच घटकांना मिळतात असे नाही. कारण, शेतकरी वर्गातील सर्वच शेतक-यांपाशी अन्नधान्याची स्वतःची व स्वतःच्या कुटुंबाची वर्षभराची गरज भागवून विकण्याइतपत वाढीव उत्पादन असतेच असे नाही. परिणामी, खरेदीदरामध्ये सरकारने कितीही वाढ घडवून आणली तरी तिचा लाभ विकण्याइतपत अतिरिक्त उत्पादन पदरी असणा-या शेतक-यांनाच मिळतो. सर्वसाधारणतः असे शेतकरी हे मोठे जमीनधारक असतात. गहू, तांदूळ या तृणधान्यांचे आणि साखरेचे (पर्यायाने उसाचे) असे अतिरिक्त उत्पादन करणारे असे मोठे शेतकरी काही राज्यांतच विशेष प्रमाणात असतात. साहजिकच, खरेदीदरातील वाढीचा फायदा सर्व राज्यांतील अल्पभूधारक, लहान शेतक-यांना होतोच असे नाही. हे झाले दुसरे कारण.

स्वस्त धान्य दुकानामधून अनुदानित दराने वितरित केल्या जाणा-या अन्नधान्य जिनसांच्या खरेदीद्वारे नागरिकांना मिळणा-या उत्पन्नवर्धक अध्याहृत अनुदानाच्या रकमेचे मोजमाप करणे, ही या अभ्यासाची पहिली पायरी ठरते. प्रचलीत व्यवस्थेनुसार तांदूळ, गहू आणि साखर या तीन जिनसा सार्वजनिक वितरण यंत्रणेमार्फत उपलब्ध करून दिल्या जातात. या तीन जिनसांची कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीसाठीची मात्रा यंत्रणेनेच निश्चित केलेली आहे. तांदूळ, गहू आणि साखर या तीन जिनसांच्या सार्वजनिक वितरण यंत्रणेने ठरवून दिलेल्या मात्रेला स्वस्त धान्य दुकानात आकारल्या जाणा-या अनुदानित किमतींनी गुणले की स्वस्त धान्य दुकानांच्या व्यवस्थेद्वारे मिळणा-या अन्नधान्य जिनसांच्या खरेदीपायी कुटुंबाला कराव्या लागणा-या खर्चाचे मोजमाप आपल्या हाती येते. या तीन जिनसांच्या त्या दरडोई मात्रेला त्या जिनसांच्या खुल्या बाजारपेठेतील किमतींनी गुणले की, कुटुंबाने त्या जिनसांची तितकी मात्रा स्वस्त धान्य दुकानाऐवजी बाजारातील अन्य

एखाद्या दुकानातून खरेदी केली असती तर त्या कुटुंबाला जेवढा खर्च करावा लागला असता त्याचे मोजमाप आपल्या हाती येते. या दोहोंतील फरक म्हणजे उत्पन्नवर्धक अध्याहृत अनुदानाची दरडोई सरासरी रक्कम.

उत्पन्नवर्धक अध्याहृत अनुदानाच्या दरडोई सरासरी रकमेचे राज्यवार मोजमाप या पद्धतीने २००९-१० या वर्षासाठी इथे केलेले आहे. तांदूळ, गहू व साखर या तीन अन्नघटकांवर राज्याराज्यांतील कुटुंबांना मिळणा-या सरासरी अध्याहृत अनुदानाचे या तीन जिनसांच्या खरेदीवर कुटुंबांद्वारे केल्या जाणा-या एकंदर खर्चाशी असलेले प्रमाणही या ठिकाणी बघणे उपयुक्त ठरते. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण यंत्रणेने २००९-१० या वर्षासाठी संकलित केलेल्या आकडेवारीचा आधार या हिशेबासाठी घेतलेला आहे.

स्वस्त धान्य वितरण व्यवस्थेद्वारे मिळणा-या उत्पन्नवर्धक अध्याहृत अनुदानाच्या राज्यवार दरडोई सरासरी रकमेची तुलना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यवार अदा केल्या जाणा-या दरडोई सरासरी वेतनउत्पन्नाशी करणेही रोचक ठरते. २००९-१० या वर्षी हे वेतनउत्पन्न देशपातळीवर सरासरीने ५०१ रुपये असे होते. तर, स्वस्त धान्य व्यवस्थेच्या माध्यमातून कुटुंबांना मिळणा-या उत्पन्नवर्धक अध्याहृत अनुदानाची दरडोई सरासरी रक्कम देशपातळीवर त्याच वर्षी होती ४०१ रुपये अशी. ग्रामीण भागांचा विचार केला तर, उत्पन्नवर्धक अध्याहृत अनुदानाची दरडोई सरासरी रक्कम २००९-१० या वर्षात होती ४५८ रुपये इतकी, तर, अनुदानाची तीच सरासरी दरडोई रक्कम देशातील शहरी भागांमध्ये होती ३५२ रुपये इतकी. २००९ साली विविध राज्यांत कोणकोणते पक्ष सत्ताधीश होते आणि त्या त्या राज्यात उत्पन्नवर्धक अध्याहृत अनुदानाची सरासरी दरडोई पातळी किती होती याचे चित्र पाहणे उद्बोधक ठरावे.

सुरुवात करू भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षापासून. २००९ साली काँग्रेस अथवा त्याचा मित्रपक्ष सत्तेवर असलेल्या आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, पाँडिचेरी, महाराष्ट्र, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, हरियाना, उत्तराखंड आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मिळणारे सरासरी दरडोई वेतनउत्पन्न स्वस्त धान्य दुकानांच्या व्यवस्थेद्वारे मिळणा-या उत्पन्नवर्धक अध्याहृत दरडोई



सरासरी अनुदानापेक्षा लक्षणीयरीत्या कमी होते. तर, राजस्थान, झारखंड, आसाम, मेघालय, मणिपूर आणि मिझोराम या राज्यांत या संदर्भातील चित्र बरोबर उलटे होते.

त्याच वर्षी भारतीय जनता पक्ष अथवा त्याचा मित्रपक्ष सत्तेवर असलेल्या राज्यांचा विचार केला तर, गुजरात, गोवा, पंजाब, छत्तीसगड या राज्यांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अदा केले जाणारे दरडोई सरासरी वेतनउत्पन्न स्वस्त धान्य योजनेंतर्गत प्राप्त होणा-या उत्पन्नवर्धक अध्याहृत दरडोई सरासरी अनुदानापेक्षा कमी होते, असे दिसते. तर, मध्य प्रदेश आणि नागालँडमध्ये मात्र हे चित्र नेमके उलटे होते. अन्य राज्यांचा विचार करता, तामिळनाडू आणि ओडिशा या दोन राज्यांत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेद्वारे मिळणारे दरडोई सरासरी वेतनउत्पन्न स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून मिळणा-या उत्पन्नवर्धक दरडोई सरासरी अध्याहृत अनुदानाच्या तुलनेत खूपच कमी होते. तर, बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि त्रिपुरामध्ये ते उत्पन्नवर्धक दरडोई सरासरी अध्याहृत अनुदानापेक्षा अधिक असल्याचे स्पष्ट झाले.

या ठिकाणी एका वास्तवाची जाणीव ठेवावयास हवी. स्वस्त धान्य दुकानांच्या व्यवस्थेद्वारे वितरित केल्या जाणा-या तांदूळ-गहू-साखर या तीन जिनसांच्या अनुदानित किमतींद्वारे कुटुंबांना मिळणा-या उत्पन्नवर्धक अध्याहृत सरासरी दरडोई अनुदानाच्या मोजमापात ऊर्ध्वगामी कल (अपवर्ड बायस) संभवतो, ही ती बाब. अन्नधान्याच्या खुल्या बाजारातील महागाईचा हा परिणाम होय. स्वस्त धान्य दुकानांच्या व्यवस्थेद्वारे वितरित करण्यासाठी सरकार ज्या वेळी अन्नधान्याची खरेदी करते त्या वेळी त्या खरेदीचा परिणाम अन्नधान्याच्या खुल्या बाजारातील मागणी व पुरवठ्याचे समीकरण बदलवण्यात घडून येतो. त्यांतून, अन्नधान्याच्या खुल्या बाजारपेठेतील किमती चढता कल दाखवू लागतात. साहजिकच, उत्पन्नवर्धक अध्याहृत दरडोई सरासरी अनुदानाचा ऊर्ध्वगामी कल अधिकच ठसठशीत भासू लागतो. या वाढत्या किमतींच्या वास्तवाचा नकारात्मक प्रभाव राज्यात सत्तेवर असलेल्या पक्षाला होणा-या मतदानाच्या टक्केवारीतील वाढीवर जाणवावा, हे मग ओघानेच येते. ही शक्यता ध्यानात घेऊनच, तांदूळ-गहू-

साखर या तीन जिनसांच्या खरेदीसाठी कुटुंबांकडून केल्या जाणा-या एकंदर खर्चाशी याच तीन जिनसांद्वारे मिळणा-या उत्पन्नवर्धक अध्याहृत अनुदानाचे सरासरी प्रमाण 'रिग्रेशन इक्वेशन' मांडत असताना विचारात घेतलेले आहे.

तांदूळ-गहू-साखर या तीन जिनसांची कुटुंबांनी स्वस्त धान्य दुकानांमधून केलेली खरेदी आणि याच तीन जिनसांची खुल्या बाजारपेठेतून केलेली खरेदी अशा उभय खरेदींद्वारे कुटुंबांनी केलेल्या खर्चाचा अंतर्भाव या एकूण खर्चामध्ये केलेला आहे. यामुळे, उत्पन्नवर्धक अध्याहृत दरडोई सरासरी अनुदानाच्या मोजमापातील ऊर्ध्वगामी कलाचे निराकरण पुरतेपणाने होत नसले तरी त्याचा निरास काही प्रमाणात तरी शक्य होतो. त्याचे कारणही सोपे व उघडच आहे. तांदूळ-गहू-साखर या तीन जिनसांच्या खुल्या बाजारपेठीय किमतींमध्ये वाढ घडून आली की या जिनसांच्या खरेदीपोटी कुटुंबांना कराव्या लागणा-या खर्चातही आपसूकच वाढ घडून येते, हेच ते कारण. त्यामुळे, उत्पन्नवर्धक अध्याहृत दरडोई सरासरी अनुदानाचे तांदूळ, गहू व साखर या तीन जिनसांवरील खर्चाशी असलेले प्रमाण थोड्या प्रमाणात कमी झालेले दिसून येते.

स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून कुटुंबांना मिळणा-या उत्पन्नवर्धक अध्याहृत दरडोई सरासरी अनुदानाच्या रकमेचे कुटुंबांद्वारे तांदूळ-गहू-साखर या तीन जिनसांच्या खरेदीवर केल्या जाणा-या एकंदर खर्चाशी असलेले प्रमाण २००९-१० या वर्षात सर्वाधिक म्हणजे ७४ टक्के इतके होते तामिळनाडूमध्ये. त्या नंतर त्या खालोखाल क्रमाने येणारी देशातील अन्य राज्ये आणि/अथवा केंद्रशासित प्रदेश म्हणजे, लक्षद्वीप (६८ टक्के), छत्तीसगड (४२ टक्के), अंदमान व निकोबार द्वीपसमूह (३९ टक्के), हिमाचल प्रदेश (३६ टक्के), त्रिपुरा (३६ टक्के), कर्नाटक (३३ टक्के), आंध्र प्रदेश (३२ टक्के) आणि जम्मू-काश्मीर (३२ टक्के). स्वस्त धान्य यंत्रणेची व्याप्ती, विस्तार आणि या योजनेच्या लाभांचा फैलाव या राज्यांमध्ये तुलनेने खूपच चांगला असावा, असे अनुमान या आकडेवारीवरून काढण्यास जागा आहे. तर दुसरीकडे, स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून कुटुंबांना मिळणा-या उत्पन्नवर्धक अध्याहृत दरडोई सरासरी अनुदानाच्या रकमेचे



कुटुंबांद्वारे तांदूळ-गहू-साखर या तीन जिनसांच्या खरेदीवर केल्या जाणा-या एकंदर खर्चाशी असलेले प्रमाण २००९-१० या वर्षात केवळ १० टक्के अथवा त्यांपेक्षाही कमी असलेली दिल्ली, मणिपूर, हरियाना, राजस्थान, आसाम, झारखंड व उत्तराखंड यांसारखी राज्येही आपल्याला दिसतात. या राज्यांच्या किंचितसा वरती क्रमांक लागतो तो महाराष्ट्राचा. २००९-१० या वर्षात महाराष्ट्रात हे प्रमाण होते ११ टक्के इतके.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रोजगार मिळालेल्या अनुसूचित जातसमूहातील व्यक्तींचे अनुसूचित जातसमूहांच्या ग्रामीण लोकसंख्येतील प्रमाण अथवा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अनुसूचित जातसमूहांतील व्यक्तींना मिळालेले दरडोई सरासरी वेतनउत्पन्न या दोन चल घटकांकडे, २००९ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीदरम्यान भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत (२००४ सालच्या निवडणुकीतील मतांच्या टक्केवारीच्या तुलनेत) झालेल्या वाढीचे मोठे श्रेय जाताना दिसते. असे असले तरीही, स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून कुटुंबांना मिळणा-या उत्पन्नवर्धक अध्याहृत दरडोई सरासरी अनुदानाचाही काहीएक वाटा मतांची ती टक्केवारी वाढण्यामध्ये होता, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. मात्र, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत मिळणा-या वेतनउत्पन्नाचा मतांच्या टक्केवारीतील वाढीस कारणभूत ठरणारा प्रभाव हा, स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून कुटुंबांना मिळणा-या उत्पन्नवर्धक अध्याहृत दरडोई सरासरी अनुदानाच्या प्रभावापेक्षा अधिक बलवान असण्याची शक्यता संभवते. त्याला कारणही तसेच आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मिळणा-या वेतनउत्पन्नाचा लाभ संबंधित लाभार्थी कुटुंबांना थेट आणि दृश्य स्वरूपात मिळतो. तर, स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून मिळणा-या उत्पन्नवर्धक दरडोई सरासरी अनुदानाचा लाभ हा स्वरूपतः अध्याहृत आणि प्रतिकात्मक असाच असतो. यांवरून असेही वाटते की, स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्नवर्धक अध्याहृत अनुदान प्रत्यक्ष रूपाने मिळाल्यास त्याचा मतांवर होणारा परिणाम अधिक प्रभावी होऊ शकेल. ***(कृपया पृष्ठ क्रमांक ३७ पाहावे).***

जिकडेतिकडे

# एक मस्त 'खुशाल' कलंदर....

"Not a nice man to know", ही आपली उपाधी म्हणा वा प्रतिमा खुशवंतसिंग यांनी जन्मभर मोठ्या निष्ठेने आणि प्रेमाने जपली. खुशवंतसिंग यांनी निर्माण केलेल्या विपुल व वैविध्यपूर्ण साहित्यातून व्यक्त होणा-या त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे ही प्रतिमा त्यांना चिकटली की, कोणी तरी, कधी तरी चिकटवलेल्या त्या प्रतिमेशी सुसंगत अशीच आपली जीवनशैली व लेखनप्रकृती जपण्याचा वसा खुशवंतसिंग यांनी आमरण जपला, याचे उत्तर देणे अवघड आहे. कदाचित खुशवंतसिंग यांनाही या प्रश्नाचे उत्तर शोधणे मुष्किलीचे ठरले असते ! ...अर्थात, या प्रश्नाला उत्तर शोधण्याचा प्रयत्न त्यांनी मनःपूर्वक आणि पुरेशा गांभीर्याने केला असता तर !! "आयुष्यात कोणत्याच गोष्टीकडे मी फारसे गंभीरपणे कधीच बघितले नाही. एवढेच काय, कोणाही व्यक्तीकडे अथवा तिच्या म्हणण्याकडे मी गांभीर्याने पाहत नसे.... याला माझा स्वतःचाही अपवाद नाही", असे खुद्द खुशवंतसिंग यांनीच लिहून ठेवलेले आहे. असा मोकळाढाकळा कलंदरपणा हा खुशवंतसिंग यांच्या अस्तित्त्वाचा स्थायीभाव होता. त्यामुळेच, 'खुशालसिंग' हे आईवडिलांनी ठेवलेले पाळण्यातील नावही त्यांनी खुशाल 'खुशवंतसिंग' असे स्वतःच बदलून टाकले. तेही शाळकरी वयातच ! फाळणीपूर्व पंजाबातील हदालीसारख्या सुदूर खेड्यातून वयाच्या पाचव्या-सहाव्या वर्षी एकदम दिल्लीसारख्या बहुढंगी शहरातील शाळेमध्ये दाखल झाल्यानंतर 'खुशालसिंग' या नावाची वर्गमित्रांनी चालविलेली टवाळी पाहून-ऐकून एक दिवस 'खुशालसिंग'चे 'खुशवंतसिंग' असे रूपांतर त्यांनी स्वतःच करून टाकले. "भगवंतसिंग या माझ्या भावाच्या नावाशी ध्वनिसाधर्म्यही या नामांतरामुळे साधले गेले", अशी मल्लीनाथीही खुशवंतसिंग यांनी त्याबाबत केलेली सापडते. मात्र, शाळेतल्या मित्रांकडून त्या वयात उचललेला टवाळीचा उद्योग या कलंदर खेळियाने पुढे उमरभर मोठ्या आवडीने केला. त्यांपायी अनेकांचा रोषही ओढवून घेतला.



"Not a nice man to know", ही प्रतिमा प्रस्थापित होण्यात या टवाळखोरीचा वाटा चांगलाच घसघशीत आहे, हे वास्तव खुशवंतसिंग यांनी कधीच नाकारले नाही. उलट, ही प्रतिमा त्यांनी मोठ्या अभिमानाने आयुष्यभर मिरवली. भारत सरकारने बहाल केलेला 'पद्मभूषण' पुरस्कार सरकारला तडकाफडकी परत करणा-या खुशवंतसिंग यांना, बहुधा, त्यांना बहाल करण्यात आलेली ही उपाधी 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी पुरस्कारापेक्षाही मोलाची वाटत असावी. टवाळी करायला फारशी अक्कल लागत नाही, अशी एक सार्वत्रिक आणि लाडकी धारणा आहे. परंतु, त्याच टवाळीचा वापर ज्या वेळी व्यक्तिगत तसेच सामाजिक जीवनात ओतप्रोत भरलेल्या दंभाचा स्फोट करण्यासाठी अमोघ हत्यार म्हणून केला जातो त्या वेळी सूक्ष्म निरीक्षण, प्रगल्भ आकलन, अचाट प्रतिभा, तरल कल्पनाशक्ती, निःसंग निर्भीडपणा, समृद्ध शब्दसंपदा ... अशा अनेकानेक गुणक्षमतांचे प्रगाढ अस्तर वावदूकपणाला जोडलेले असावे लागते. ही सारी साधनसामग्री खुशवंतसिंग यांच्या पोतडीत उदंड सामावलेली होती. अर्थात, त्या मागे त्यांची तितकीच प्रदीर्घ साधना होती. आता, 'साधना' या शब्दाला खुद्द खुशवंतसिंग यांनीच आक्षेप घेऊन तो हसण्यावारी नेला असता, हा भाग अलाहिदा ! परंतु, लेखक म्हणून स्वतःची जडणघडण करण्यासाठी जी तपस्या खुशवंतसिंग यांनी प्रामाणिकपणे केली तिचे महत्त्व त्यामुळे उणावत नाही. त्यामुळेच त्या मेहेनतीकडे अतिशय संवेदनशीलतेने बघायला हवे. लेखन आणि सातत्यपूर्ण विविधांगी लेखन ही खरोखरच कष्टसाध्य बाब आहे, हे वास्तव साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रातील उमेदवारीच्या काळात खुशवंतसिंग यांना फार लवकर उमगले. कष्टांच्याबाबतीत अंगचोरपणा हा खुशवंतसिंग यांच्या स्वभावातच नव्हता. अन्यथा, लघुकथा, इतिहासलेखन, अनुवाद, कादंब-या, स्तंभलेखन, व्यक्तिचित्रणे... असे बहुरंगी साहित्य अखंड पाच-सहा दशके प्रसवत राहण्याची हुकुमी सर्जनशीलता विकसित करणे त्यांना शक्यच झाले नसते. मुळात खुशवंतसिंग हे हाडाचे पत्रकार होते. त्यामुळे, हाताशी असलेल्या मर्यादित वेळेत, मोजक्या शब्दांत किमान वाचनीय मजकूर शब्दबद्ध करण्यासाठी आवश्यक असलेल्या हुकुमी प्रतिभाशक्तीची उपासना हा त्यांच्या लेखनसाधनेचा गाभा राहिला.

''Not a nice man to know'', या आपल्या प्रतिमेवरच निहायत खूष असलेले खुशवंतसिंग हे विलक्षण राजस व्यक्तिमत्त्व होते. जीवनाला गंभीर अर्थ वगैरे फार काही नसतो; असलाच तरी तो शोधण्याच्या भानगडीत उगीचच फारसे पडू नये; माणसाच्या वाट्याला एकच आयुष्य एकदाच येते तेव्हा त्याचा उपभोग चौफेर घ्यावा; भरपूर आनंद लुटावा आणि आपण आनंद लुटत असतानाच तो बाकीच्यांनाही भरभरू न वाटावा... याच भूमिकेतून तब्बल ९९ वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य खुशवंतसिंग मनःपूत जगले. त्या अर्थाने खुशवंतसिंग हे निखळ इहवादी आणि पक्के निरीश्वरवादी होते. आईवडिलांनी पाळण्यात ठेवलेल्या 'खुशालसिंग' या त्यांच्या नावाशी सुसंगत अशीच त्यांची ही जीवनविषयक दृष्टी होती. त्यांमुळे अनंत रूपांनी फुलून सामो-या येणा-या जीवनातील आनंदरस त्यांनी असोशीने आकंठ प्राशन केला. अगदी त्यांची प्राणसखी असणा-या मदिरेप्रमाणेच आणि तितकाच समरसून ! औपचारिक शिक्षणाच्या प्रांतात काठावर पास होण्यापुरतेच मार्क जेमतेम मिळवणा-या खुशवंतसिंग यांनी सृष्टीचे विशाल पुस्तक मात्र मोठ्या संवेदनशीलतेने न्याहाळले आणि अभ्यासले. त्यामुळे, दर ऋतूत कात टाकणा-या, क्षणाक्षणाला रंग बदलणा-या निसर्गाचे अनंत बारीकसारीक विभ्रम तितक्याच तरलपणे वेचून त्यांची पखरण आपल्या लेखनात ठायीठायी मोठ्या नजाकतीने करणे हा खुशवंतसिंग यांच्या लेखनप्रकृतीचा विशेष राहिला. निसर्गवाचनाइतक्याच दक्ष विचक्षणपणे खुशवंतसिंग आयुष्यभर माणसे वाचत राहिले. याही अर्थाने ते हाडाचे पत्रकारच होते. कारण, 'माणसे वाचणे' हाच तर पत्रकाराचा प्राणवायू असतो. त्यांसाठी त्यांना संधीही बहुविध मिळाल्या. जीवनाचे कोणतेच क्षेत्र खुशवंतसिंग यांनी कधीच वर्ज्य मानले नाही. त्यामुळे, वकील, राजदूतावासातील माहिती अधिकारी, कथा-कादंबरीकार, इतिहासलेखक, साहित्यिक, अनुवादक, संशोधक, अध्यापक, पत्रकार, संपादक, राज्यसभा सदस्य अशा बहुरंगी भूमिका बजावत मानवी मनोव्यापारांचे अगणित कवडसे न्याहाळण्याची संधी खुशवंतसिंग यांना लाभली. बाह्यसृष्टीपेक्षाही अनंत पटींनी व्यामिश्र असणा-या मानवी मनोसृष्टीतील सूक्ष्मातिसूक्ष्म पदर टिपून शब्दांच्या माध्यमातून खुशवंतसिंग मग ते उलगडत राहिले.



''Not a nice man to know'', ही प्रतिमा रूढावण्यास खुशवंतसिंग यांच्या लेखनामागील नेमकी हीच एक प्रेरणा बलवत्तर ठरली असावी. समाजव्यवहाराच्या अनेकविध प्रांतांतील नाना प्रकारच्या आणि वेगवेगळ्या पदांवरील व्यक्तींशी खुशवंतसिंग यांचा वेळोवेळी संबंध येत राहिला. समाजमानसात मानसन्मान आणि प्रतिष्ठा प्राप्त केलेल्या उच्चपदस्थांच्या रोजच्या साध्यासाध्या व्यवहारांतही स्पर्धा, स्वार्थ, कोडगेपणा, लालसा, असुया, वासना, लोभ, दंभ, वरपंग, लुबरेपणा, लुच्चेगिरी, हडेलहप्पी यांसारख्या हीन भावभावनांचे प्रकटीकरण किती निबर ढोबळपणाने होत असते याचे दर्शन त्यांना वेळोवेळी जवळून होत राहिले. पद-लौकिकांच्या कितीही झुली अंगावर चढवल्या तरी अखेर गणमान्य लोकोत्तरांचे पाय मातीचेच असतात हा साक्षात्कार खुशवंतसिंग यांना या विश्वरूपदर्शनाद्वारे झाला. मुळात आपण जसे नसतो नेमके तसेच आपण आहोत याचे प्रदर्शन जगापुढे मांडण्यासाठी लब्धप्रतिष्ठित प्रसंगी किती ढोंगी बनू शकतात याचे किळसवाणे अनेक नमुने त्यांनी अनुभवले. खुशवंतसिंग यांची पिंडप्रवृत्ती जात्याच गोष्टीवेल्हाळ. त्यालाच जोड लाभली होती जन्मजात रसाळ कथनशैलीची. त्यामुळे, व्यक्तिगत तसेच सार्वजनिक जीवनात पदोपदी व्यापून उरलेल्या दंभाचा भोपळा वाणी-लेखणीच्या माध्यमातून फोडण्यासाठी ही सारी सामग्री खुशवंतसिंग यांच्या हाताशी कायमच सिद्ध असे. रंजन आणि भंजन या खुशवंतसिंग यांच्या साहित्यनिर्मितीमागील दोन आद्य आणि प्रबळ प्रेरणा होत्या. तर, रंजनाद्वारे दंभभंजन घडवून आणणे हा लेखनधर्म त्यांनी आयुष्यभर मनोभावे जपला. त्यांच्या रंजनमय भंजक लेखनधर्माचे प्रासंगिक चटके बसलेल्यांचे खुशवंतसिंग यांच्याशी विळ्या-भोपळ्याचे सख्य निर्माण झाले नसते तरच नवल ! अडचणीचा ठरणारा माणूस अथवा मजकूर टाळण्याकडेच कोणाचीही सर्वसाधारण प्रवृत्ती असते. त्यामुळेच खुशवंतसिंग यांच्या साहित्यव्यवहाराकडे फारसे गांभीर्याने बघितले गेले नाही. त्यांच्याबद्दल वाचकांना कुतूहल वाटत राहिले पण लोकादर काही त्यांच्या वाट्याला फारसा फिरकला नाही. खुशवंतसिंग यांनाही मुदलात त्याचे फारसे सोयरसुतक कधीच नव्हते. लिहिण्याच्या अदम्य ऊर्मीतून हा कलंदर खेळिया अखेरपर्यंत अखंड लिहित राहिला.■■

*(पृष्ठ क्रमांक ३२ वरून)*

स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून मिळणा-या उत्पन्नवर्धक दरडोई सरासरी अनुदानातील वाढ बव्हंशी संबंधित अन्नधान्य घटकांच्या महागाईचे द्योतकच ठरते. परिणामी, मतदारांचा अनुकूल प्रतिसाद त्यांमुळे खालावण्याचीच शक्यता संभवते. त्याच वेळी, महागाईपायी चलनाच्या घटत्या क्रयशक्तीची झळ राष्ट्रीय रोजगार हमी योजनेद्वारे मिळणा-या वेतनउत्पन्नाला बसू नये या दृष्टीने वेतनदरात अनुरूप असे वार्षिक बदल घडवून आणण्याची तरतूद योजनेमध्ये केलेली आहे. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेद्वारे मिळणा-या वेतनउत्पन्नाचा काँग्रेस पक्षाला २००९ सालच्या निवडणुकीदरम्यान मिळालेल्या मतदारांच्या प्रतिसादावरील प्रभाव या उभय कारणांपायीच अधिक महत्त्वपूर्ण व अनुकूल ठरला असावा. ■■

**प्रमुख संदर्भ**

**(A) Magazines -**

(1) The Economist March 8 - 14 th, March 29 - April 4 th 2014.

(2) Current Science, Volume 106 Number 4, 25 February 2014

**(B)Books/Reports -**

(1) IPCC WG II AR5 Summary for Policymakers 31 March 2014.

(2) Dalits and Adivasis in India's Business Economy: THREE ESSAYS AND AN ATLAS; Barbara Harriss-White with Elisabetta Basile, Anita Dixit, Panaki Jodday, Aseem Prakash and Kaushal Vidyarthee, Three Essays Collective, Gurgaon, Haryana, 2014.

(3) Truth, Love and a Little Malice; Khushwant Singh, Viking in association with Ravi Dayal Publisher, New Delhi, 2002.

**Poverty in India**

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी फक्त १०० / - रुपये**

**द्वैवार्षिक वर्गणी फक्त १८०/ - रुपये**

**त्रैवार्षिक वर्गणी फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट**

**पंचवार्षिक वर्गणी फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)

(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

**Working Lives and Worker Militancy : The Politics of Labour in Colonial India - Ravi Ahuja (Ed)., Tulika Books, New Delhi, 2013, pp xvi + 328, Price Rs. 695/-**

औद्योगिक कंपन्या आणि या कंपन्यांच्या संदर्भात तसेच सरकारी सेवेतील कर्मचा-यांसाठी असलेल्या वेतनआयोगामुळे ‘वेतन’ या शब्दाला विशेष महत्त्व प्राप्त झालेल्या आजच्या काळापासून पार मागे जायचे, अगदी कामगार चळवळीचा काळाच्याही मागे! भारतावर इंग्रजांचा अंमल असण्याच्या काळातील इतिहासाची पाने चाळायची, जातीपातींचे व्यवहार आठवायचे, स्वातंत्र्यलढ्याच्या कहाण्या ऐकायच्या या मानसिकतेत प्रवेश केला की इंग्रजांच्या अंमलाखाली असलेल्या तत्कालीन भारतातील कामगारविश्वात काय काय घडत होते ते समजून येते. प्रस्तुत ग्रंथाने हेच काम केले आहे. त्या काळातील कोणत्याही कष्टकरी वर्गाच्या दैनंदिन जीवनव्यवहारात राजकारण होते, राजकीय संघर्षही होता आणि लढाऊपणाही होता. वर्गसंघर्ष, जातीचे राजकारण आणि कामगारांचा संघर्ष या सर्व बाबी परस्परांमध्ये गुंतलेल्या होत्या. राष्ट्रवादी चळवळी आणि कामगार चळवळी यांतही गुंतागुंत निर्माण होत होती. अभिजन गटातील राजकीय पुढारी आणि कामगारवर्गातील बुद्धिवादी हे आपापल्या परीने समाजजीवनात, राजकीय जीवनात आघाडीवर येऊ पाहात होते. त्या काळाच्या समाजजीवनातील ताणेबाणे आणि नानाविध कंगोरे यांचा वेध इतिहासाच्या अभ्यासकांनी प्रस्तुत ग्रंथात घेतला आहे. साधारणपणे १८६० ते १९४० या आठ दशकांमध्ये घडलेला हा इतिहास त्या काळातील कामगारांच्या जीवनात घडत गेलेल्या राजकारणावर प्रकाश टाकतो. कामगारांचा इतिहास हा प्रामुख्याने राजकीय इतिहास आहे ही भूमिका या ग्रंथाने अधोरेखित केलेली आहे. प्लेगचा काळातील कामगारजीवन, चर्मोद्योगातील कर्मचा-यांचा संघर्ष, तागाच्या गिरणीतील संप, रौलेट सत्याग्रह अशा अनेक घटनांचा ऊहापोह करणारा हा ग्रंथ इतिहासाच्या अभ्यासकांना उपयुक्त वाटावा. ■■



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2013-2015
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■‘इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी’ ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (‘जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी’) चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

### - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●विकास चित्रे ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा ●अभय टिळक
●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●आनंद नाडकर्णी ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●योगेंद्र यादव ●नीळकंठ रथ
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून ‘अर्थबोध’, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**